Metric 3.3.1 - Number of research papers published per teacher in the Journals notified on UGC care list during the last five years

Clarification Asked- 1. HEI is requested to provide all the required details in the prescribed data template, as in the provided sheet few columns are blank. So please relook and provide all the required data. 2. kindly note that calendar year should be considered in this metric, as paper published in year 2018 should comes under 2018-19 so on and paper in 2023 comes under 2023-24, Please check and provide data accordingly. 3. Kindly note that Multiple Counting of the same publication done by same author or different author in an Academic year should be count as one. 4.Kindly note that Publication in the current UGC CARE with ISSN only will be considered. 5.Kindly provide the link for paper landing and journal website. 6.Kindly provide year wise screenshots of each research articles clearly showing the title of the article, affiliation, name of the journal, year and authors name. If the links and DOI number are not available. Not: If details given are not complete with the links/ screenshot, the respective publication will not be considered. Note:- Kindly note that without supporting documents HEI Claim could not be considered.

Response-

1) Paper published/ Papers/ Certificate as applicable of publications are attached in clickable format for opening. **(Appendix-I)**

# Appendix-I

Swami Vivekanand Bahuuddeshiya Vikas Shikshan Sanstha, Rohana

# Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana

Tq. Arvi, Dist. Wardha

**NAAC Accredited with 'B' Grade (CGPA-2.19)**

One Day Interdisciplinary International Conference on

**IMPACT OF RACE,CASTE,CLASS & RELIGION ON INDIAN & INTERNATIONAL SOCIETY**

in collaboration with Aadhar Research Publication,Amravati & Eleven Colleges in Indian University

This is to certify that Dr./Mr./Mrs. **Anil ishwar Thool**

of **Aniket College of social work wadsa**

Has participated in One Day Interdisciplinary International Conference on Impact of Race,Caste,Class & Religion on Indian and International Society on Dated 23rd July 2021.He/She online presented paper organised by Late Vasaatrao Kolhatkar Arts College,Rohana & Collaboration with Eleven Colleges in Indian University & B.Aadhar Multidisciplinary International Peer Reviewed & Index Research Journal with Impact Factor 7.675(SJIF) with ISSN-2278-9308 In Recognition of the publication of paper entitled with

**Andhshrdhewr swsaklpnecha honara parimam. 1 manasshateiy adhyan**

| | | |
|---|---|---|
| Editor<br>Dr.Nitin A.Mathankar<br>Principal<br>Late Vasantrao Kolhatkar Arts College,Rohana | Chief Editor<br>Prof.Virag S.Gawande<br>Director,Aadhar Social Research & Development Training Institute,Amravati | Guest Editor & Co-ordinator<br>Prof.Dr.Deoman S.Umbarkar<br>Organizing Secretary<br>Head,Deptt.of Sociology |

Made for free with Certify'em

Principal
Aniket College of Social Work
Wadsa, Dist. Gadchiroli

**B.Aadhar** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308

Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 303 (CCCIII) | July 2021

# अंधश्रद्धेवर स्वसंकल्पनेचा होणारा परिणाम : एक मानसशास्त्रीय अध्ययन

प्रा. डॉ. अनिल आय. थूल

अनिकेत समाजकार्य महाविद्यालय,देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली

मो.नं.८८०६०४६०१०,Mail ID : anilthool@gmail.com

सारांश

रोटर्स यांच्या सामाजिक अध्ययन सिद्धातामुळे स्थानिक नियंत्रण केन्द्र (Locus of Control) ही संकल्पना विकसित झाली. काही व्यक्ती आपल्या वर्तनाचे नियंत्रण केन्द्र म्हणून नशीब किंवा दैवाला महत्व देतात म्हणजेच आपल्या जीवनात घडणाऱ्या विविध घटना, प्रसंग याबाबत स्वतःचे नशीब, दैव इत्यादी बाह्य शक्तिस जबाबदार धरतात. याला बाह्य नियंत्रण केन्द्र (External Locus of Control)किंवा बाह्य घटक म्हणतात. याउलट काही व्यक्ती आपल्या वर्तनाचे नियंत्रण केन्द्र नशीब व दैवी याला जबाबदार न धरता स्वतःला व स्वतःच्या प्रयत्नाला किंवा कर्तृत्वाला जबाबदार धरतात. म्हणजेच स्वतःच्या नशीबावर, दैवावर स्वतःचेच नियंत्रण असणे म्हणजेच स्वकर्तृत्वावर विश्वास असणे याला आंतरिक नियंत्रण केन्द्र (Internal Locus of Control) असे म्हणतात. स्थानिक नियंत्रणाच्या बाबतीत बाह्य व्यक्तिच्या वर्तनाचे नियंत्रण केन्द्र आंतरिक किंवा स्वतःच्या आत्मशक्तित असते. सदर विषयावर सहसंबंधाची पडताळणी केली असता सकारात्मक स्वसंकल्पना जास्त बुद्धीमत्ता आणि आंतरिक नियत्रण केन्द्रीत व्यक्ती हा नकारात्मक स्वसंकल्पना, कमी बुद्धीमत्ता व बाह्य नियंत्रण केन्द्रीत व्यक्तिपेक्षा कमी अंधश्रद्धाळू असतात. तसेच पुरुष हे स्त्रियापेक्षा कमी अंधश्रद्धाळू आढळतात. यामध्ये शिक्षणाची भूमिका सुद्धा महत्वाची आहे.

अंधश्रद्धा

भारतीय लोकांची एकूण जडणघडण आणि उभारणी ही दैववाद, नशीब, मोक्ष, पूर्वजन्म, कर्मसिद्धांत, ज्योतिष्य, चमत्कार, शुभ–अशुभ, व्रतवैकल्ये अशी कितीतरी अतार्किक, अवैज्ञानिक, भोपळ कल्पना फलद्रुप होण्यासाठी केली जाणारी निरर्थक कर्मकांडे कोणतीही प्रथा, परंपरा किंवा एखादी घटना नीट तपासून तिची उपयुक्तता व सत्यता पडताळून स्विकारण्याऐवजी रुढीग्रस्त वृत्ती व मानसिकता कमी होताना दिसत नाही. हे निरक्षर, अडाणी लोकांच्या बाबतीतच घडते असे नव्हे तर चांगले सुशिक्षीत, विज्ञानाच्या कितीही पुढे गेले तरी विज्ञानाच्या अभ्यासातून वैज्ञानिक दृष्टी आणि वैज्ञानिक मनोभाव निर्माणच होत नाही. अंधविश्वाचे चलन हे दिवसेदिवस वाढतच असल्याचे दिसते आणि या अंधविश्वासाची कास या विज्ञान युगातही टिकून आहे असे दिसून येते. इंग्रज लोकही सुद्धा यात मागे नाहीत स्पेंसर आणि हक्सले असे मानत की, १३ हा आकडा त्यांच्यासाठी अशुभ आहे. बुद्धीप्रामाण्यवादी सुद्धा यावर विश्वास ठेवतात की, जर आपणास नवीन कार्य सुरु करावयाचे असल्यास ते शुक्रवारी करू नये. कारण शुक्रवार हा दिवस नवीन कार्य करण्यासाठी योग्य नाही.

आजचे युग हे स्पर्धेचे युग म्हणून ओळखले जाते. या युगात मानवी जीवन अतिशय गतिमान आहे. असे निदर्शनास येते. तंत्रज्ञान व औषधीशास्त्र यात बरीच प्रगती झाल्याचे दिसते. तरीही मनुष्याने अतार्किक कार्यवृत्ती किंवा अंधश्रद्धा जोपासल्या आहेतच. आजच्या काळातही आरसा फुटणे हे अशुभ मानणारे लोक आहेतच.

जोहोदा (Johoda) - (१९६९) यांच्या मते, अंधश्रद्धा हा मनुष्याच्या जीवनाचा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. अंधश्रद्धा या एखाद्या नियंत्रकाप्रमाणे मानसशास्त्रीय कार्य करतात.

व्याख्या

१)प्रा. सौ. आशा परूळेकर यांच्या मते, "डोळस दृष्टिकोन बाळगता अंधपणाने जी श्रद्धा जोपासली जाते त्याला अंधश्रद्धा म्हणतो."

२)प्रा. श्याम मानवाच्या मते, "जे मुळात सत्य नाही, त्यावर विश्वास ठेवणे म्हणजे अंधश्रद्धा होय."

३)ज्योतिराम भोसले यांच्या मते, "अंधश्रद्धा म्हणजे एखादी परंपरेने आलेली विचार व



Principal
Aniket College of Social Work
Wadsa, Dist. Gadchiroli

बुद्धीच्या कसोटीला न उतरणारी गोष्ट म्हणजे स्विकारणे होय."

स्वसंकल्पना

स्वसंकल्पनेविषयी गार्डन आलपोर्ट म्हणतात, "स्व म्हणजे ज्याची आपल्याला ताबडतोब जाणीव होते. म्हणजे आपल्यामध्ये असलेला एक प्रकारचा गाभा होय." म्हणजेच व्यक्तीचे स्वत: विषयीचे विचार म्हणजे स्वसंकल्पना होय. स्वत:चे स्वत: विषयीच्या सर्व समजूती आणि स्वत: विषयीची संपूर्ण माहिती ही संकल्पनेत समाविष्ठ आहेत. व्यक्तिची स्वत:कडे पाहण्याची अभिवृत्ती ही स्वसंकल्पनेत समाविष्ठ आहे.

व्यक्तिच्या अभिवृत्तीचे तीन विभाग आहेत.

(१) बोधात्मक

(२)भावनात्मक

(३) क्रियात्मक

(१) बोधात्मक अंगात स्वत: बद्दल वर्णनाचा समावेश होते. असे मी बुद्धीमान, प्रामाणिक, ईमानदार, महत्वाकांक्षी, उच्च, बलवान, वजनदार इत्यादी आहे.

(२)भावनात्मक भावनात्मक अंगात स्वत: बद्दलच्या भावनांचा समावेश होतो. असे मी लोकांना आवडत नाही, मला झुरळाची भीती वाटते, लोकांना माझे गाणे आवडते, स्त्रिया माझा तिरस्कार करतात, मला सर्दिचा त्रास होतो. मी कुत्र्याला घाबरतो वगैरे या भागात भावनात्मक बाबींचे मूल्यांकन होते.

(३) क्रियात्मक अंगात मनुष्य स्वत: कसा वागेल व कसे वागण्याची शक्यता आहे हा भाग अंतर्भूत होतो. जसे त्या अपघाताचे वर्णन ऐकल्यानंतर मी माझे रडू आवरू शकलो नाही. म्हणजेच वेदनेची तीव्रता फार मोठ्या प्रमाणात असने. तेव्हा अशा क्रिया व्यक्त होतात.

अध्ययनाचे उद्देश

(१)स्वसंकल्पनाचे अंधश्रद्धेशी संबंध जाणून घेणे.

(२)मुले व मुली यांच्यातील अंधश्रद्धेबाबत फरक शोधणे.

(३)विज्ञान व कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या अंधश्रद्धेचे स्वरूप पाहणे.

अध्ययन पद्धती

देसाईगंज शहरातील असलेले २ विज्ञान महाविद्यालय, २ कला व वाणिज्य महाविद्यालय व १ समाजकार्य महाविद्यालयातील ६० विद्यार्थ्यांची नमुना म्हणून नियमित अंकन पद्धतीने निवड केली. अध्ययनाचे क्षेत्र हे गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज (वडसा) शहर आहे. या अध्ययन कार्यात (१) ई. एल. किंग यांची अंधश्रद्धा मापण श्रेणी (२) डॉ. मुक्ताराणी रस्तोगी यांची स्वसंकल्पना मापण श्रेणी (३) रोटर्स यांची स्थानिक नियंत्रण मापण श्रेणी यांचा उपयोग केला आहे. या अध्ययनात २×२×२ या घटनात्मक आराखड्याचा उपयोग करण्यात आला. या अध्ययनात उत्तरदात्यांच्या गुणांकनावरून त्याचे सरासरी मुल्य (Mean) आणि प्रमाण विचलन मूल्य (SD)काढण्यात आले. व दुसऱ्या टप्प्यात उत्तरदात्यांच्या गुणांकाचे विश्लेषण व स्पष्टीकरण करण्यासाठी त्रिमार्गी सांख्यिकीय पद्धतीचा उपयोग केला.

विषय विश्लेषण

प्राचीन काळामध्ये समाजामध्ये अंधश्रद्धेचे प्रमाण जास्त होते. त्यामुळे या अंधश्रद्धा समाजामध्ये दैनंदिन जीवनात दिसून येत असते. पण आजच्या वैज्ञानिक युगातसुद्धा अंधश्रद्धा असल्याचे दिसून येते. अंधश्रद्धेबाबत अनेक संशोधकांनी अभ्यास केला असता, त्यांना असे दिसून येते की, सर्व प्रकारच्या अंधश्रद्धांमध्ये निसर्गवादाला महत्व देण्यात आले आहे.

गडचिरोली जिल्हा आदिवासी व मागास म्हणून ओळखला जातो. त्यामुळे इथे इतर जाती पेक्षा आदिवासींचे प्रमाण जास्त आहे. व ते देवदेवतांना जास्त महत्व देतात. म्हणून त्यांच्यात इतरांपेक्षा अंधश्रद्धेचे प्रमाण जास्त दिसून येते. महाविद्यालयात विविध विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या अंधश्रद्धेविषयी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन कार्य करण्याकरीता प्रेरीत होवून सदर विषयावर अध्ययन कार्य केले.



Principal
Aniket College of Social Work
Wadsa, Dist. Gadchiroli

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 303 (CCCIII) | July 2021

प्रमुख शोध

(१)स्वसंकल्पनेवर उच्च सार्थक फरक आठ वर्गीकृत समुहात आढळते. तरीही सकारात्मक संकल्पनेशी संबंधीत लोक नकारात्मक स्वसंकल्पनाच्या व्यक्तिपेक्षा कमी अंधश्रद्धाळू आढळते.

(२)उच्च बुद्धीमता असेलल्या लोकांची निम्न बद्धीमता असलेल्या लोकांशी तुलना केली असता कमी अंधश्रद्धाळू आढळले.

(३)आंतरिक नियंत्रण केन्द्र असलेले लोक बाह्य नियंत्रण केन्द्र असलेल्या लोकापेक्षा कमी अंधश्रद्धाळू आढळले.

(४)विज्ञान शाखेतील व्यक्ती ह्या कला आणि समाजकार्य व्यक्तिशी तुलना करता कमी अंधश्रद्धाळू आढळले.

(५)स्त्रीया ह्या तुलनेने पुरूषपेक्षा जास्त अंधश्रद्धाळू आढळल्या.

निष्कर्ष

वरीलप्रमाणे निरीक्षणावरून असे निष्कर्ष काढण्यात आले की, सकारात्मक स्वसंकल्पना, उच्च बुद्धीमता आणि आंतरिक नियंत्रण केन्द्र असलेली व्यक्ती ह्या नकारात्मक स्वसंकल्पना, कमी बुद्धीमता व बाह्य नियंत्रण केन्द्र असलेल्या व्यक्तीपेक्षा कमी अंधश्रद्धाळू असतात. पुरूष हे स्त्रियापेक्षा कमी अंधश्रद्धाळू आढळतात. यामध्ये शिक्षणाची भुमिका महत्वाची आहे. कारण कला व समाजकार्य शाखेतील विद्यार्थी हे विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा जास्त अंधश्रद्धाळू आढळतात.

संदर्भ सूची

१)कन्हाडे डॉ. बाबू (२००४), आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, मानवता सांस्कृतिक विकास शोध केन्द्र, चामोर्शी.

२) कतरणी सौ. स्फुर्ती (२०००), 'मानसशास्त्रीय विचार विषयक आणि उपाययोजना' साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३) देशपांडे प्रा. सु. वा. (१९८०), 'मानसशास्त्रीय प्रयोग',कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

४) दाभोळकर डॉ. नरेन्द्र, 'अंधश्रद्धा विनाशाय',राजहंस प्रकाशन, पुणे.

५) पवळेकर प्रा. सौ. आशा, 'जनमनाचे मानसशास्त्र',विमल प्रकाशन, पुणे–३०.

६) पंडीत डॉ. र. पी. (१९८५), 'मानसशास्त्राची मुलतत्वे',विद्या प्रकाशन, नागपूर.

७) बोधनकर डॉ. सुधीर व अलोणी प्रा. विवेक (१९९९), 'सामाजिक संशोधन पद्धती',साईनाथ प्रकाशन, नागपूर.

८) मानव प्रा. श्याम (१९९०), 'बादल अंधश्रद्धेचे',मनोविकास प्रकाशन, मुंबई.

९) Adornaort Al (1930), 'The Authoritari an Personality', Newyork Harper.

१०)Becker S. M., 'Superstitions and Suggestions', Disserstation 1969-70.

११)Johoda G., 'The Psychology of Supersition', Great Britain Pelican Books 1970.

१२)Plug C., 'An Investigation of Supersititous Belters and Behaviour Journal of Behaviourial Science', 1975 (June) Vol. 2 (4) P. P. 169-178.

१३)Willian Benton, 'Encyclopaedia Britanic Vol. 21 University of Chicase 1969. Manual For Raven's Progressive.

Principal
Aniket College of Social Work
Wadsa, Dist. Gadchiroli

ISSN 2249-3344 ( The North Pole)

# विषय:– बालकामगार निर्लज्ज समाजव्यवस्थेचे शिकार

–प्रा.डॉ. अनिल आय थूल
कार्य. प्राचार्य
अनिकेत समाजकार्य महाविद्यालय
देसाईगंज (वडसा) जि.गडचिरोली

राष्ट्र परिषद 20 नोहेंबर 1989 साली बालहक्क संहिता मजूर केली. भारतात 11 डिसेंबर 1992 साली करून मान्यता दिली. या संहितेच्या व्याख्येनुसार 18 वर्षाखालील व्यक्ती म्हणजे मुल होय.ही संहीता म्हणजे हक्काची अतिशय काटेकोर आणि योग्य भाषेत केलेली सविस्तर यादी आहे. ढोबळमानाने हि यादी जगण्याचा हक्क शिकण्याचा हक्क सहभागाचा हक्क आणि सुरक्षिततेचा हक्क अशी चार विभागता येते. सर्व हक्काचा विचार केल्यास ही सर्व हक्क या सर्व मुलांना मिळतात काय? असा प्रश्न निर्माण होतो. अलिकडच्या काळात दररोज एक बातमी बालकावर होणाऱ्या अत्याचाराविषयी असते. दिवसेंदिवस होणाऱ्या अत्याचाराच्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे.निरागस बालमन उमलण्याआधीच कोमेजून आहे. हॉटेल,मॉल,किराणा दुकान,छोटे मोठे उद्योग या सर्व ठिकाणी बालकामगार दिसून येतात. ठिकाणीतर कामासाठी मुलांना पळवून आणल्या जाते त्यांची विक्री सुध्दा होत असते. त्यामुळे या संवेदनशील विषयावर गांभीर्यपूर्वक विचार होणे बालकामगार समुळ नष्ट करण्यासाठी जागविणे महत्वाचे आहे

## कामगाराचा अर्थ:–

बालकामगार (प्रतिबंध व नियमन) कायदा 1986 हा केंद्रीय कायदा आहे. जो भारतातील बालमजुरीच्या नियमन करतो. या कायद्यान्वये 14 वर्षाखालील मजुरीचे काम करणाऱ्या बालकास बालकामगार जाते. या कायद्याच्या अंमलबजावणीची संपूर्णजबाबदारी कामगार विभागाची आहे. या कायद्यान्वये 14 धोकादायक उद्योगधंदे व प्रकियेत काम करणाऱ्या मुलांना प्रतिबंध तर इतर उद्योगधंदयामध्ये काम मुलाच्या कामाच्या वातावरणाबाबत नियमन केले जाते.

## ची संख्य

Rights And Your)

संस्थेच्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात 496 लाख बालकामगार असून देशात महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक ते 14 या वयोगटातील बालकामारांची 2001 च्या जनगणेनुसार संख्या 764075 तर 2011 मध्ये हिच संख्या इतकी आहे. सर्वाधिक बालकामगारांची संख्या उत्तप्रदेशामध्ये असून त्याखलोखाल महाराष्ट्राचा क्रमांक 2001 ते 2011 दरम्यान वाढलेली बालकामगारांची संख्या चकीत करणारी व समाजमनाला विचार करायला आहे की, बालकामगार संख्या का वाढत आहे?

## मगाराचे स्वरुप :–

बालपण ही व्यक्तीच्या जीवनातील अविस्मरणीय क्षण असतो. कोणतीही चींता नाही व कोणतीही जिम्मेदारी उडणे,कुदणे,मौजमस्ती करणे व शाळेत जाणे एवढेच काम. परंतु, सर्वांचेच बालपण असे असेलच असे नाही. भिकारी,आईवडीलांनी दुर्लक्ष केलेले बालक,हरविलेले बालक हे बालकामगाराच्या दलदलीत फसले जातात. कमितकमि 215 मिलीयन मुले ज्यांचे वय 14 वर्षापेक्षा कमि आहे. त्यांचे बालपण शाळा कोणाच्यातरी घरात,हॉटेलात,उद्योगधंद्यात,भांडी झाडुपोछा करण्यात जात आहे. भारतात बालकामगारांची स्थिती भितीदायक होत चालली आहे.



Principal
Aniket College of Social Work
Wadsa, Dist. Gadchiroli

जगभरात सर्वाधीक बालकामगार मुले ही भारतात आहेत. केवळ मोठया शहरांमध्येच नव्हे तर छोटया शहरांमध्ये, वस्त्यांमध्ये सुध्दा पाच ते दहा रूपयांचे लालच दाखवून मुलांना बालकामगार म्हणून ओढले जात अत्यंत गरीब व दुर्लक्षित बालकांची केवळ बालकामगार म्हणूनच फसवणुक होते असे नाही तर कीत्येकवेळा वेगवेगळया प्रकारचे लालच दाखवून त्यांच्यावर मोठया प्रमाणावर लैंगीक,शारीरीक शोषन होत आहे.

त्याचा त्यांच्या बालमनावर गंभीर परीणाम होतो.मोठया शहरांमध्ये बचपण बचाओ CRY SAVE THE CHILD यासारख्या अनेक स्वयंसेवी संस्था बालकामगारांच्या मुक्तीकरीता अविरत प्रयत्न करीत आहेत. परंतु या समाजाचे सहकार्य मिळत नाही. ही दुखाची बाब आहे. बालकामगारांच्या स्थिती सुधारण्यासाठी केंद्र पर 1986 बालकामगार प्रतिबंधक व नियमन कायदा तयार केला ज्याद्वारे बालकांकडून काम करवून घेतल्यास समजल्या जाईल. 2005 पासून केन्द्र सरकारने बालकामगाराच्या समुळ उच्चाटना करीता राष्ट्रीय बालकामगार सुरू केलेले आहे जे महाराष्ट्रात 19 जिल्हयामध्ये सुरू आहे. शासकीय स्तरावर बालकामगाराच्या निर्मुलनासाठी कायदे व अंमलबजावणी करण्यासाठी विविध यंत्रणा सुध्दा तयार केलेल्या आहे. तरीही बालकामगाराची संख्या बालकांवर होणाऱ्या अत्याचारापासुन होणारी वाढ बघता ही विचार करण्यास लावणारी बाब आहे.

आजचा बालक हा उद्याचा सुजाण नागरिक होण्यासाठी त्याच्या बालपणामध्ये त्याचा योग्य संस्कार आहार शिक्षण मिळणे.अनिवार्य आहे. त्याचे अधिकार सुध्दा आहे. परंतु बालकांच्या या समस्याकडे अजुनही गांभीर्याने जात नाही. गल्ली बोळयात वस्तीमध्ये टपरीवर,दुकान,हॉटेल,छोटे मोठे उद्योगात बालकामगार मुल, भिकारी आढळून येतात पण त्यांना तो शाळेत न जाता हो काम का करतो याची चौकशी करण्याची वेळ सुधा समा बालकामगार बालक सुध्दा हा एक समाजाचा घटक असतो त्याच्या विकासाकडे लक्ष देणे हे एक सामाजिक आहे. परंतु समाजाच समाज असते याची यावेळी घरकामाकरिता समाजाकडून सामाजिक दायीत्वाचा विचार परंतु त्याच समाजात जेव्हा घरकामासाठी बालकाना घरात कोंडून ठेवले जाते. बालकविकल घेतले जाते. अशा समाजाकडून कोणती अपेक्षा करावी हाही प्रश्न निर्मान होतो. प्रत्येक व्यक्ती आपली जबाबदारी झटकतो.

उद्देश:–

बालकामगाराच्या संदर्भात सदर अध्ययन कार्य खालील उद्देशांना अनुसरून करण्यात येते.

1. बालकामगारांची वर्तमान स्थितीचे अध्ययन करणे.
2. बालकामगारासाठी शासकीय स्तरांवर करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे अध्ययन करणे.
3. बालकामगार निर्माण होण्यामागील कारणांचे अध्ययन करणे.

गृहीत कृत्ये :–

1) सामाजिक दुर्लक्ष,गरीबी,लाचारी व गरजांची अपूर्तता यामुळे बालकामगारांची संख्या वाढत आहे.

2) शासकीय उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे बालकामगार निर्मुलनास अडथळा येतो.

अध्ययन क्षेत्र:–

गडचीरोली व देसाईगंज शहराची अध्ययनाकरीता निवड करण्यात आली.

नमुना निवडपध्दती :–

नमुना निवडपध्दतीच्या प्रकारापैकी सोयीस्कर नमुना निवडपध्दतीचा उपयोग करण्यात आला.

तथ्य संकलन :–

तथ्य संकलनाच्या प्राथमीक व दुय्यम दोन्ही पध्दती द्वारे तथ्य संकलन करण्यात आले. यामध्ये पूस्तक, वर्तमानपत्रे, इन्टरनेट,यासाधनाने वरिल माहिती बालकांचे क्षेत्रात कार्यकरणाऱ्या व्यक्तीच्या मुलाखती इत्यादी साहित्याचा उपयोग करण्यात आला.



Principal
Aniket College of Social Work
Wadsa, Dist. Gadchiroli

ISSN 2249-3344 ( The North Pole)

**न आराखडा :–**

संशोधन आराखडयाचे स्वरुप निदानात्मक आहे.

**नांचे निष्कर्ष :–**

1. स्थलांतरीत होणाऱ्या कुटुंबातील व पालकांचे दुर्लक्षीत असलेल्या कुटूंबातील बालकामगार जास्त आहेत.
2. कुटूंबामध्ये अन्न,वस्त्र,निवारा या मूलभूत गरजा पूर्ण होत नसलेल्या कुटूंबातील मूल मोलमजुरीकडे जास्त वळतात.
3. घरुन पळून गेलेले,हरवीलेले बालके,रस्त्यावर भटकणारी बालके, मजूरीकडे ओढल्या जातात.
4. कमी पैशात जास्त काम यामुळे व्यवसायीक वर्ग बालकामगार मोठया प्रमाणात ठेवतात.
5. झाडू काम,घर काम,धुने भांडी,वेटर,सामान विक्री या कामापेक्षा बालकामगार जास्त असतात.
6. बालकामगारांच्या संदर्भात अनेक कायदे आहेत. परंतु अंमलबजावणीचा अभाव आहे याकायद्यांची माहिती सर्वसामान्य जनतेला नाही.
7. बालकामगारांच्या समस्याबाबत समाजामध्ये गांभीर्य नाही.

**श :–**

बालकामगार ही एक सामाजिक समस्या असुन या समस्येने उग्र रूप धारण केले आहे. समाज या बालकांशी ढ टाकल्याप्रमाणे वागतो आहे. बालकामगारांच्या संदर्भात प्रत्येक व्यक्ति बालकामगार हा समाजाचा लेकरू आहे. सुध्दा स्वतःच्या मुलाप्रमाणे जिवन जगण्याचा अधिकार आहे. या भावनेने कार्य करणार नाही तोपर्यंत अशा मगाचे बालपण परत मिळणार नाही.

आज घडीला फक्त जिलास्तरावर बालकांसाठी कार्य करणाऱ्या योजनांचा विचार केला तर कामगार विभाग, य बालकामगार प्रकल्प , बालकल्याण समिती, महीला व बाल अधिकारी कार्यालय ,विशेष बाल पोलीस पथक सेवी संस्था ,सर्व शिक्षा अभियान,शालेय विभाग,आरोग्य विभाग इ. यंत्रणा कार्यरत आहे. परंतु अजुनही शाळाबाह्य लकामगारांची संख्या वाढतच चालली आहे. कारण बालकांच्या समस्यांना अधिकारी,कर्मचारी व समाजाने पाहीजे त्या गांभीर्याने घेतलेले नाही हेच यातुन स्पष्ट होते.

बालकामगार ही सामाजीक समस्या नसुन कलंक आहे असे म्हणण्यास काहीच हरकत नसावी. कारण न्याय समाजातील एक लेकरू जो उपजीविकेसाठी आपल्या गरजा भागविण्यासाठी बालपणात मोलमजुरी करतो या बालपणात त्याने शाळेत असायला हवे. परंतु असे होतांना दिसत नाही. याला अकार्यक्षम यंत्रणेचे व जननाचे द्योतक म्हणावे लागेल.

**र्भ :–**


1. मुलांचे लैंगीक शोषण , सुरक्षितता त्यांची, जबाबदारी आपली – विद्या आपटे
2. सर्वसाधारण कार्यनियमावली बालकल्याण समिती (महीला व बालविकास विभाग महाराष्ट्र शासन2009)
3. श्रम व रोजगार मंत्रालयाचे संकेतस्थळ
4. बालकामगारांची संख्या जनगणना 2001 व 2011


Principal
Aniket College of Social Work
Wadsa, Dist. Gadchiroli.

ISBN : 978-93-82962-22-9

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या विकासात शासनाची भूमिका

प्रा. डॉ. संजय एच. बाळबुद्धे
श्रीनिकेत समाजकार्य महाविद्यालय
देसाईगंज जि. गडचिरोली

**प्रस्तावना :–**

भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील दुर्बल घटक विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घ्यावी आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकीपासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. भारतीय संविधानातील या मार्गदर्शक तत्वास अनुसरून पंचवार्षिक योजनांमध्ये मागासवर्गीयांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणांचा कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभाग विविध विकास योजना राबवित आहे.

महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्र 3,07,713 चौ. कि.मी. एवढे असून त्यापैकी 51,757 चौ. कि.मी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण 16.5 टक्के एवढे होते. गेल्या चार दशकातील राज्याची लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांची तुलनात्मक आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| जनगणना वर्ष | राज्याची एकूण लोकसंख्या (लाखात) | आदिवासी लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1971 | 504.12 | 38.41 | 7.62 |
| 1981 | 627.84 | 57.72 | 9.19 |
| 1991 | 789.37 | 73.18 | 9.27 |
| 2001 | 968.79 | 85.77 | 8.85 |
| 2011 | 1123.74 | 105.10 | 9.35 |

महाराष्ट्र राज्यात एकूण 45 अनुसूचित जमाती आहेत. त्यात मुख्यत्वे भिल्ल, गोंड महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम(यवतमाळ जिल्हा), कातकरी (मुख्यतः रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) या केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत.

राज्यात एकूण 35 जिल्हे आहेत आणि आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक व ठाणे (सह्याद्री प्रदेश) या पुर्वेकडिल वनाच्छादित जिल्ह्यांमध्ये मुख्यतः अधिक आहे.

1975–76 या वर्षी भारत सरकारने निर्देश दिल्याप्रमाणे ज्या गावातील आदिवासी संख्या एकूण लोकसंख्येच्या 50 टक्क्याहून अधिक असेल त्या गावाचा समावेश एकात्मिक आदिवासी प्रकल्पामध्ये (आयटीडीपी) करण्यात आला. भारत सरकारने मान्यता दिलेले अशाप्रकारे 16 प्रकल्प होते. नंतर ज्या गावांमधील आदिवासींची लोकसंख्या 50 टक्क्यापेक्षा किंचितशी कमी होती त्या गावांचा समावेशही अशा एकात्मिक आदिवासी विकास

प्रकल्प क्षेत्रामध्ये करण्यात आला आणि अशी क्षेत्रे अतिरिक्त आदिवासी उपाययोजना (एटीएसपी गट / प्रकल्प) म्हणून ओळखण्यात येऊ लागली. राज्यशासनाची मान्यता मिळालेली अशी 4 अतिरिक्त आदिवासी उपाययोजना प्रकल्प क्षेत्रे आहेत. कालांतराने विखुरलेल्या स्वरूपातील इतर क्षेत्रामधील आदिवासींची संख्या लक्षात घेऊन आणि त्या ठिकाणी चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांचा विचार करून मुंबई, औरंगाबाद आणि अकोला यासाठीही प्रकल्प मंजूर करण्यात आला. तसेच जव्हार–मोखाडा भागातील / क्षेत्रातील आदिवासींची मृत्यूची संख्या लक्षात घेऊन आणि आरोग्य पोषण आणि संवायोजन याकडे काटकाईने लक्ष देण्याच्या गरजेचा विचार करून ठाणे जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्राची 2 प्रकल्पाऐवजी 3 प्रकल्पांमध्ये विभागणी करण्यात आली. अशा रितीने सध्या एकूण प्रकल्प अधिकाऱ्यांची संख्या 24 आहे.

दरम्यानच्या काळात एकात्मिक आदिवासी प्रकल्प क्षेत्रालगतच्या प्रदेशातही काही ठिकाणी आदिवासींची वस्ती असल्याचे भारत सरकारच्या लक्षात आले, म्हणून सुमारे 10,000 लोकवस्तीच्या दोन पेक्षा अधिकगावांमध्ये आदिवासींची संख्या 50 टक्क्याहून अधिक असेल तर अशा गावाचा समावेश सुधारित क्षेत्र विकास खंडामध्ये (माडा) करण्यात यावा असे निर्देश देण्यात आले. त्याचप्रमाणे एकूण 5,000 लोकवस्तीच्या दोन किंवा तीन गावांमध्ये 50 टक्क्याहून अधिक आदिवासींची संख्या असेल तर, त्या गावांचा समावेश मिनीमाडा क्षेत्रामध्ये करण्यात यावा, अशा सूचना आहेत. महाराष्ट्रामध्ये एकूण 43 माडा क्षेत्र आणि 24 मिनीमाडा क्षेत्रे आहेत.

आदिवासी विकास विभागाकडे सोपविलेल्या कामकाजामध्ये अधिक उत्तरदायी प्रशासन होण्याच्या दृष्टीने 1992 मध्ये या विभागाची पुनर्रचना करण्यात आली. त्यानुसार राज्यात आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे अधिपत्याखाली चार अपर आयुक्त आदिवासी विकास, नाशिक, ठाणे, अमरावती व नागपूर व 24 प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये कार्यरत असून त्यापैकी 11 एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अत्यंत संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्यामध्ये नाशिक, कळवण, तळोदा, जव्हार, डहाणू, धारणी, किनवट, पांढरकवडा, गडचिरोली, अहेरी व भामरागड यांचा समावेश आहे.

सदर प्रकल्प कार्यालयांच्या माध्यमातून वरील आदिवासी उपयोजना व आदिवासी उपयोजन बाह्य क्षेत्रात वैयक्तिक / सामुहिक लाभाच्या योजना राबविण्यात येत आहेत. जनतेच्या माहितीसाठी सदर योजनांचा संक्षिप्त परिचय या लेखाद्वारे करण्यात येत आहे.

### विभागातील प्रशासन यंत्रणेची रचना खालीलप्रमाणे

मंत्री, आदिवासी विकास विभाग

↓

राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग

↓

प्रधानसचिव, आदिवासी विकास विभाग

↓

| | | |
|---|---|---|
| आयुक्त<br>आदिवासी संशोधन व<br>प्रशिक्षण संस्था, पुणे | 1) व्यवस्थापकिय संचालक<br>महाराष्ट्र राज्य आदिवासी<br>सहकारी विकास महामंडळ | आयुक्त<br>आदिवासी विकास<br>म.रा. नाशिक<br>मर्या., नाशिक |
| ↓ | ↓ | ↓ |
| सहआयुक्त<br>अनुसूचित जमाती<br>पडताळणी समिती<br>(पुणे,नाशिक, नंदुरबार, नाशिक<br>ठाणे, औरंगाबाद, अमरावती<br>नागपूर, गडचिरोली | 2) शबरी आदिवासी<br>वित्त आणि विकास<br>महामंडळ, मर्या., | अपर आयुक्त,(4)<br>आदिवासी विकास,<br>(नाशिक, ठाणे<br>अमरावती, नागपूर)<br>↓<br>प्रकल्प अधिकारी<br>ए.आ.वि. प्रकल्प(24) |

ISBN : 978-93-82962-22-9

**आदिवासी विद्यार्थ्यांसाठीच्या उपयोजना**

राज्य शासनाने श्री.द.म. सुकथनकर, राज्य नियोजन मंडळाचे सदस्य आणि माजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून समितीच्या अहवालातील शिफारशी स्विकारल्या आहेत. त्यानुसार सन 1993–94 पासून सुधारित आदिवासी उपयोजना लागू करण्यात आल्या आहेत. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या 9 टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. त्यामुळे सदर लोकसंख्या विचारात घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी जनतेच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशा आशयाची शिफारस सुकथनकर समितीने केली. सदर शिफारशीनुसार टप्पाटप्याने 9 टक्के पर्यंत नियतव्यय उपलब्ध करून द्यावयाचा होता. त्याप्रमाणे टप्प्या टप्प्याने प्रतिवर्षी नियतव्ययात वाढ होऊन सन 2005–06 पासून सरासरी 9 टक्के नियतव्यय उपलब्ध होत आहे.

सदर योजनांसाठी कमाल कर्यादेच्या अधिन राहून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे जिल्ह्यातील अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून आदिवासी उपयोजन क्षेत्र व बाहय क्षेत्रात राबविण्याच्या योजनांचे प्रस्ताव मागवितात व संकलित प्रारुप आराखडा तयार करून जिल्हा नियोजन मंडळापुढे मजुरीसाठी सादर करतात. याप्रमाणे प्रत्येक जिल्हा नियोजन मंडळाने मंजुर केलेला जिल्हानिहाय प्रारुपआराखडा संकलित करून राज्याची जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तयार होते. सदर योजनेत योजनानिहाय प्रस्तावित नियतव्ययास मंजुरी मिळाल्यानंतर मंजूर नियतव्य अर्थसंकल्पीत करून प्रत्येक विभागास मागणीप्रमाणे आदिवासी विकास विभाग तरतुद उपलब्ध करून देत. त्याप्रमाणे संबधित विभागाकडून मार्गदर्शक सुचनाप्रमाणे खर्च करण्यात येतो व खर्चाचा मासिक प्रगती अहवाल आदिवासी विकास विभागास सादर केला जातो.

आदिवासी विकास विभागामार्फत जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय योजना राबविण्यात येते आहे. तथापी सन 2009–2010 या आर्थिक वर्षात माहे डिसेंबर 2010 पासुन आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक टिएसपी–2008/प्र.क्र.6/का–6, दिनाक 16 डिसेंबर 2009 अन्वये आदिवासी उपयोजना जिल्हा वार्षिक योजना निधी अर्थसंकल्पीत करणे, वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती अमलात आली आहे.

**विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना**

❖ भासकीय आश्रम□ाळा :–

अतिदुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकांच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास जलदगतीने घडवून आणण्यासाठी सन 1972–73 पासुन शासनाने निवासी आश्रमशाळा समूह योजना कार्यान्वीत केलेली आहे. ही योजना मुख्यत्वे करून अतिदुर्गम, डोंगराळ व पाड्यातील आदिवासी मुला/मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून शैक्षणिकदृष्टया त्यांना सुशिक्षित करणे व त्यायोगे त्यांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने राबविण्यात येते. शिक्षणाची ज्ञानगंगा दऱ्याखोऱ्यात, दुर्गम पाड्यात पोहचविण्याचे काम शासकीय आश्रमशाळांमार्फत होत आहे. या योजनेनुसार अनुसूचित जमाती क्षेत्रात 5000 ते 7000 लोकसंख्येच्या क्षेत्रात एक आश्रमशाळा हा सर्व सर्वसाधारण निकश ठरविण्यात आला आहे. काही क्षेत्रातील भाग हा अतिदुर्गम असून तेथे लोकवस्ती ही पाड्यापाड्यांमध्ये विखुरलेली असल्याने अशा काही ठराविक ठिकाणी 3000 ते 5000 लोकसंख्येच्या क्षेत्रास एक आश्रमशाळा हा निकश सन 1982 पासुन ठरविण्यात आला आहे.

❖ आश्रमशाळा व्यवस्थापन

महाराष्ट्र राज्यात आदिवासी विकास विभागाचे अधिनस्त एकूण 552 शासकीय आश्रमशाळा आहेत.

त्यापैकी :–

| | |
|---|---|
| • प्राथमिक आश्रमशाळा | 128 |
| • माध्यमिक आश्रमशाळा | 424 |

त्यापैकी :–

| | |
|---|---|
| • इंग्रजी माध्यमाच्या पब्लीक स्कुलच्या धर्तीवर | 5 |
| • इग्रजी माध्यम | 6 |
| एकूण इंग्रजी शाळा | 11 |

एकूण शाळांपैकी

75

# भारतातील लिंगभाव जाती व धर्म आणि माध्यमांचा हस्तक्षेप

प्रा. डॉ. संजय एच. बाळबुधे
अनिकेत समाजकार्य महाविद्यालय,
देसाईगंज, जि. गडचिरोली

जात पंचायतीचे अधिकार कायद्याने नष्ट करण्यात आले. म्हणून जात पंचायत ही कमकुवत बनली अथवा नामशेष झाली. बदलत्या परिस्थितीत गाव सोडून जाणे अन्य व्यवसायात जाणे हे सर्व जातींच्या बाबतीत घडू लागले. नगराशी सतत संबंध येत राहिल्याने जातीत पूर्वीचे सामाजिक संबंध ही राहीले नाही. अशा परिस्थितीत जात पंचायतीच्या अस्तित्वाला काही अर्थ उरला नाही.

जात पंचायत कमकुवत बनली तरी अनिश्चित परिस्थितीत खात्रीचा आधार म्हणून जातीतील एकजुट आजही कायम राहीली. नागरी समाजात जाती पोटजातींच्या अनेक संस्था अस्तित्वात आलेल्या आहेत सहकारी संस्था, व्यापारी संस्थातील भागीदारी, राजकिय पक्ष संघटना निवडनुकितील मतदान इत्यादी गोष्टीत आजही जातीयता दिसुन येते. जातीय संस्थांनी चालविलेल्या शाळा, महाविद्यालये, वस्तीगृहे सभागृहे सुध्दा अस्तित्वात आली आहे.

गावातील पुर्वीच्या वस्तीत जाती– जातींची सरमिसळ झालेली नाही शेती, व्यवहार सरसकट सर्वच जातीमध्ये अजूनही होत नाही गावातील जाती आणि त्यांचा दर्जा यांच्यात अजूनही संबंध राहीलेला आहे. भोजन समारंभ हा सार्वजनिक असला तरच जाती भेद पाळला जात नाही. पर जातीच्या माणसाला राहावयास जागा तो समस्तरीय असला तरच दिली जाते. आजही ग्रामिण भागात राहण्याची वेळ आल्यास स्वजातीलाच प्राधान्य द्यावे लागते.

विवाह विषयक संबंध आजही जातीला अनन्य साधारण महत्व दिले जाते दोन जातीत विवाह होणाऱ्या कुटुंबाची स्थिती आजही ग्रामिण भागात वाईट असलेली दिसुन येते भिन्न जातीत विवाह घडुन येऊच नये यासाठी जाती व्यवस्थेचा दबाव ग्रामिण भागात खुप मोठ्या प्रमाणावर आहे. जातीतल्या जातीत विवाह घडुन यावा यासाठी अनेक तडजोडी होतांना ग्रामिण भागत आजही दिसतात.

जातवार जातीची विभागणी कमी अधिक प्रमाणात सर्वच खेड्यांमध्ये पाहावयास मिळते खाजगी मालक विशिष्ट जातीचे भाडेकरू आजही ठेवतांना दिसतात. नागरी लोकसंख्या ही वर्षानुवर्षेग्रामिण भागातुन लोक येत राहील्यामुळे अधिक वाढते आहे. ग्रामिण लोकही आपापल्या जातीच्या लोकांजवळ अगर त्यांच्या शेजारी जाऊन राहणे पसंत करता. त्यामुळे 'kg|k gh t lr hor, धर्मावर आधारलेले मोहल्ले दिसुन येतात.

खेडेगावात प्रत्येक जातीची कुटुंबे काही एक : दोन प्रमुख जाती संख्येने फारच कमी असतात. म्हणून त्यांची स्वतंत्र अशी संघटना होउ शकत नाही. प्रमुख जातीवरच त्यांना अवलंबुन राहावे लागते. म्हणून संघटना निर्माण करणे व्यवहार्य नसतेच परंतु शहरात प्रत्येक जाती पोटजातीची कुटुंबे संख्येने पुष्कळ असल्याने त्यांची स्वतंत्र संघटना व अस्मिता तयार होते. यामुळे जातीयतेची बिजे ग्रामिण भागातील असली तरी त्यांना खतपाणी घालविण्याचे काम शहरातूनच होते असे म्हणावे लागेल.

बदलत्या परिस्थितीत जमीन मालकिला अधिक महत्व लागले. पूर्वीची जमिन मालकीभोवतीच ग्रामिण अर्थव्यवस्था फिरत होती. शेतकरी व बलुतेदार यांच्यातील संबंध पूर्वी सारखे राहीले नाही. कारण दोन्ही पक्षांच्या वाढत्या गरजा भागवावयास त्यांच्यातील पारंपारिक संबंध पुरेपे पडू शकले नाही. त्यामुळे शेतकरी आणि बलुतेदार हे दोघेही आपल्या आर्थीक व्यवहाराकरीता शहरावर अवलंबुन राहु लागले. शहरातुन स्वतंत्रपणे

मिळालेल्या संपत्तीच्या आधार गावात जमिनी घेण्याची स्पर्धा सुरू झाली. यात लहान शेतकरी आणि शेतमजूर यांची परिस्थितीत अधिक हलाखीची झाली. ज्या कारागिरांना शहरात चांगली बाजारपेठ मिळाली, ज्यांची मुले शिक्षणात पुढे जाउ शकली व ज्यांना शहरी अर्थकारणात अन्य साधने उपलब्ध झालीत त्यांनीही गावात जमिनी विकत घेतल्या अशा रितीने जमिन मालकीवर आधारीत नवा वर्ग जाती जातीच्या उच्च निच्च श्रेणीतून छेदून गावागावातून तयार झाला. सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्यावर तिन्ही स्तरावरील सत्तास्थाने ही अशा मोठ्या शेतकऱ्यांच्या हातात गेलेली असे म्हटले जाते. म्हणजे जातीवर आधारलेली पूर्वीची उच्च निच्च श्रेणी आणि लोकशाही पध्दतीने बनलेली सत्तास्थनाची नवी श्रेणी यात तत्वता काही फरक राहीलेला नाही असे म्हणावे लागते. न्यायोरीतीने सत्तास्थानाच्या आधार तोच फक्त माणसांची अदलाबदल थोडीशी झाली असेच म्हणावे लागेल यात जातीची अदलाबदल कितपतझाली हे पाहणे उदबोधक ठरले. देशभरातल्या ग्रामिण जिवनाच्या पाहणीवरून खालच्या स्तरातील जातींनी संख्येच्या बळावर राजकिय क्षेत्रात गावातील प्रमुख जातीच्या विरूध्द भूमिका घेतल्याने चित्र काही गावातून दिसत. जाती जातीची प्रतिकार क्षमता ही आर्थीक स्वावलंबनाने वाढणे शक्य झाल्यामुळे काही गावात जात पंचायती इत्या पुन्हा जातीच्या एकजुटीकरीता कार्यान्वीत होउ लागल्या आहेत. असेही चित्र गावातून दिसते.

जाती व्यवस्था बदलात चालली आहे सर्व सामान्य समजूत आहे. जातीव्यवस्थेच्या बाहेरीलअनेक नवनवे व्यवसाय औद्योगिकरणामुळे व नागरीकरणामुळे अस्तित्वात आले आहे. त्यात आपआपल्या व्यवसायास पुरूनअसलेली सर्व जातीतून आलेली माणसे शिरलेली आहे त्याचा अर्थ जातीव्यवस्था चालील आहे असा होत नाही. कारण पूर्वीच्या शेती व्यतिरीक्त अशा सर्वच व्यवसायमध्ये त्या–त्या शिप्यांना आणि सुतारांचा व्यवसाय अनेक जातींनी पत्करलेला आहे. जमिनीची मालकीशहरातील उत्पन्नाची साधने, गावातील दुकानदारी, कन्त्राटदारी इत्यादी स्वतंत्र अर्थोत्पादनाच्या साधनाच्या सहायाने स्वतःच्या हित समजल्या गेलेल्या व्यवसायाचा त्याग करून उच्च सामाजिक दर्जा मिळविण्याचा प्रयत्न अनेक जाती करीत आहे. अलिकडच्या काळात सामाजिक दर्जा उंचावण्याचा चालू असतानाच अनेक जाती तया त्या मागासवर्गातील आहे म्हणून दावा करीत आहे मागासवर्गीयाना शासनाने देवू केलेल्या अनेक सवलतीचा, शिक्षण, नौकरी इत्यादीच्या बाबतीत त्यांच्या करीता राखुन ठेवलेल्या जागेचा हा परिणाम असावा असे म्हटले आहे.

भारतीय समाजात आज संपूर्णतः आधुनिक विचार सरणीच्या, विज्ञानाचा व बुध्दीवादाचा बोलबाला असला तरी जातीय वादाला प्रोत्साहित करणारी तत्वे ही भारतीय समाजात आहे. याव्यतीत भारतीय समाज अजुनही स्थिर आहे तो बदलेला नाही. विशेषतः खेड्यात राहणारी जनता आजही जातीगत आधारावरच आपले संपूर्ण व्यवहार करते. जातप्रथा चांगलीच आहे. विश्वास ग्रामिण लोकांचा आजही आहे. जात हा मुख्यतः रक्त संबंधीच्या गट असल्याने व्यक्ती आपले रक्त संबंधीय सोडण्यास तयार होत नाही. शहरात काही प्रमाणात जातीय व्यवस्था शिथील दिसत असली तरी खेड्यात अजुनही व्यक्तीच्या हाडामासात रूतून बसली आहे. भारताची ७० टक्के जनता आजही ग्रामिण भागात असल्यामुळे एवढी मोठी जनता जातीय व्यवस्थेला चिकटून आहे.

जातीची निर्मीती ही असमानतेच्या तत्वावर आधारीत आहे. जातीची बंधने इतकी कठोर होती की, या बंधनामुळेच कनिष्ठ जातीचे शोषण व त्यांच्यावर असंख्य अन्याय व अत्याचार झालेले आहे. जातीय व्यवस्थेने विवाहावर, खानपानावर घातलेली बंधने व्यक्तीविकासाला अडथळा आणणारी होती. समाजात विषमतेची, जातीकलहाची, जातीयवादाची व जातीय संघर्षाची निर्मीती ही जातीसंस्थेमुळेच झाली आहे. या सर्व गोष्टीचा विचार केला तर जातीप्रथा नष्ट करणेच फायद्याचे आहे. असे सर्व सामान्य माणसालाही वाटल्या वाचून राहणार नाही.

लिंगभेद ६.२ टक्के कुटुंब लिंगभेद पाळणारे आहेत. कुटुंबात मुलगी नको या पारंपारिक विचारधारणेमुळे मुलीच्या विकासाकडे हेतूपरस्पर दुर्लक्ष केल्या जाते. मुलीच्या जन्मावरून कुटुंबात अनेकदा कलह निर्माण

होती.

जातीभेद आंतरजातीय विवाहास मान्यता देणारे केवळ ०२ टक्के कुटुंब आहेत. आंतरजातीय विवाहास विरोध करणाऱ्या प्रवृत्तीमुळे कुटुंबात कलह निर्माण होतो कुटुंबाला बहिष्कृत केले जाते. ऑनरकिलींग सारखे गंभिर सामाजिक प्रश्न निर्माण होतात. त्यातुन कुटुंबातीलसामाजिक प्रतिष्ठा धोक्यात येत आहे.

लोकशाही मुल्यांची आणि आदर्शांची पेरणी आणि उभारणी करून समताधिष्ठीत समाज निर्माण करण्याची क्षमता प्रसार माध्यमामध्ये आहे पण अलिकडे प्रसार माध्यमाच्या जबाबदाऱ्या आणि बदलत्या भूमिकांचा प्रश्न ऐरणीवरआला आहे. माध्यमांचे नैतिक विश्व बदलेले आहे. प्रसार माध्यमे आणि वास्तव यांचा संबंध तुटत चालला आहे. माहीतीची वाहक असलेली जनसंवाद आणि सामाजिक माध्यमे, सामाजिक बांधिकी टिकत नाहीत. व्हॉट्सएप, फेसबुक, ट्वीटर इन्स्टाग्राम या सारख्या समाज माध्यमांच्या आभासी जगात व्यक्ती अधिकाधिक गुरफटत चालली आहे. माध्यमे आणि समाजमाध्यमांव्दारे मुद्दाम होवुन पसरविल्या जाणाऱ्या अफवा फेक व्हिडीओ, फेक फोटो, फेक न्युज खोळसाड बातम्या व्यक्ती व समाजाची दिशाभुलकरून समाजाचे ध्रुविकरण करण्यात हातभार लावीत आहेत. माध्यमे व समाज माध्यमांचे महत्व अनन्य साधारण असेच आहे परंतु आज हिच माध्यमे व समाज माध्यमे जातीधर्मांच्या नावावर समाजात विसंवाद निर्माण करण्यासाठी कारणीभूत ठरत आहेत. त्यामुळे देशाची एकता व अखंडता धोक्यात येत आहे.

**संदर्भग्रंथ :—**

१. प्रा. घाटोळे रा.ना. — ग्रामिण समाजशास्त्र व समुदाय विकास श्री मंगेश प्रकाशन नागपूर १९९४.
२. डॉ. बाबु फल्हाडे — आदिवासी समाजाचे समाजशास्त्र
३. डॉ. डी. टी. गजभिये — सामाजिक समस्या
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर — जाती निमुर्लन विषयक विचार २० मार्च १९२७.
५. डॉ. निरगुळीकर — प्रसार माध्यमे

**76**

# प्रसारमाध्यमे आणि बदलते जिवनप्रवाह

**प्रा. डॉ. समृद्धी टापरे**
समाजशास्त्र विभाग,
डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यु.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, कामठी रोड, नागपूर

************

आजचं युग हे स्पर्धेचे युग, संवाद क्रांतीचे युग..........शास्त्रीय युग.........म्हणून ओळखलं जात असले तरी यशाची पहिली पायरी म्हणून माहितीचे स्थान आजही कायम आहे. शास्त्रातील अनेक नवनव्या शोधामुळे जग लहान बनत चालले आहे. संवाद क्रांतीमुळे प्रसारमाध्यमांचे महत्व अधिकच वाढले आहे. आजच्या या आधुनिक युगातही ज्ञान, माहिती, संपर्क आणि प्रचार, प्रसारच्या माध्यमातुन अधिकाधिकांचे अधिकत्तम कल्याण साध्य करण्यासाठी तसेच अधिकाधिकांना अधिकाधिकांशी जोडण्यासाठी व संबंधीत घटकांत परस्परांविषयी विश्वसाहर्ता निर्माण करण्याबरोबरच सामुहीक विकासाच्या योजना अखेरच्या घटकांपर्यंत पोहचविण्यात, सामाजिक शिक्षण साकारण्यात, यशाचा उल्लेख सुचविण्यात तसेच लोकशाही शासन प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी भारतीय प्रसार माध्यमाची भूमिका प्रारंभापासुनच महत्वपूर्ण राहीली आहे.

भारतीय स्वातंत्र्योत्तर काळानतर भारतीय सुंविधानाने प्रदान केलेल्या मुलभुत हक्कापैकी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा लाभ होऊन एक नवी जीवनदृष्टी लाभल्यामुळे भारतीय प्रसार माध्यमांनी आपले स्थान निर्वीवाद निर्माण केले. ब्रिटीश राजवटीमध्ये भारतात गोपनियतेचा कायदा लागु केला गेला होता या कायद्यामुळे प्रशासकीय स्तरावरील विविध प्रकारच्या माहितीपासून प्रसार माध्यमांना व नागरिकांना वंचित रहावं लागत होते. आता भारत सरकारने संपूर्ण देशात जनतेला माहितीचा अधिकार प्रदान केल्यामुळे भारतीय प्रसार माध्यमांचे स्थान आणि भारतातील नागरिकांचे मुलभुत हक्क अधिक मजबुत झाले आहेत. प्रशासकीय

ISSN 2249-3344 ( The North Pole)

# दुर्बल घटकात न्याय, स्वतंत्र समतेची पेरणी करणारे फुले, शाहू, आंबेडकर,

डॉ. संजय एन. बाळबुधे
अनिकेत समाजकार्य महाविद्यालय, देसाईगंज
ता. देसाईगंज जि. गडचिरोली.

सॉक्रेटिसने म्हटल्याप्रमाणे न्याय म्हणजे शक्तीशाली लोकांचे हित जे भारतीय समाजात तंतोतंत लागू होते कारण या समाजात कायदयानुसार जरी सामाजिक समानता, समान सुरक्षा आणि कायदयासमोर समानता ह्या गोष्टी अस्तित्वात असल्या तरी गरीब वर्गासाठी न्याय हा शब्द त्यांच्या आवाक्या बाहेर आहे. राजकिय चिंतकांनी सांगितले आहे की, लोक त्यांच शासनाच्या आदेशाचे पालन करतात की जे कायदयाव्दारे आणि स्वतःचे अस्तित्वही जपतात. ॲरिस्टॉटल म्हणतो की, शासन हे चांगले जिवन घडविते. चांगले जिवन म्हणजे लोकांचा सामाजिक, नैतिक विकास जो की, शासनाव्दारे आणि कायदयाचे पालन करून होतो. फुले शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शासनाची व्याख्या केली नाही, तरिही त्यांची शासनाबाबतची मते इतर ठिकाणी आढळतात. उदा. संविधानातील कलम 34 चा पुरस्कार करतांना भाषणात त्यांनी म्हटले होते की, मुलभुत अधिकारांचा जेव्हा काहीही कायदा नसतो, तेव्हा राज्यच व शासनच गर्तेत सापडले असते. राज्याची सुरक्षीतता ही कधिही जनतेच्या सुरक्षीततेच्या वर असावे.

त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लोकशाही प्रणालीवर विश्वास दिसून येतो. त्यांच्या मते स्वातंत्र, समता आणि बंधुता या त्रिसुत्रीवर आधारीत समाज आदर्श आहे. आदर्श समाजात एका भागात होणारा बदल दुसऱ्या भागात माहीती होण्याकरीता संसाधने उपलब्ध असतात. त्यामुळे सर्व घटकातील संवाद वाढण्यास मदत होवून बंधुतेचा विकास होतो आणि यालाच लोकशाही म्हणतात. लोकशाही म्हणजे केवळ सरकारचे स्वरूप नव्हे तर ती समुह जिवन सुसंवादाची अनुभुती होय. लोकशाही म्हणजे इतराबद्दल आदर व सन्मान राखणे होय.

शासन व लोकशाही बाबतच्या वरील मतावरून फुले, शाहू, डॉ. आंबेडकरांची ही भुमीका स्पष्ट होते की, त्यांचा लोक संमतीवर आधारीत, शासनावर विश्वास होता. जनता ही स्वतंत्र असावी व अभिव्यक्ती करण्यास सक्षम असावी सामाजिक बंधनापासून ती मुक्त असावी असे फुले, शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार होते. जर ती कायदे बनविण्याच्या प्रक्रियेतील घटक नसेल? तर ती त्यांचे पालन का करावे. असा त्यांचा सवाल होता. त्यांच्या मते समाज हा मानसाचा नव्हे तर वर्गाचा बनलेला असतो. आणि म्हणूनच शासनात सर्व वर्गांना प्रतिनिधीत्व असावे जेणे करून स्वतंत्र, समता व बंधुता प्रत्यक्षात आणता येईल. असा त्यांचा आग्रह होता.

न्यायाचे दोन प्रकार आहेत, कायदयाव्दारे मिळणारा आणि सामाजिक. कायदेशीर न्याय म्हणजे राष्ट्रीयत्व आणि सदसदविवेक यावर आधारीत काटेकोर अमलबजावणी होय. तर सामाजिक न्याय आधारीत असतो. सामाजिक गरजा ध्यानात घेवून बनविलेल्या कायदयाच्या अमलबजावणीवर समाजातील सर्व वर्गाच्या व घटकांच्या सामाजिक गरजा समान नसतात. जसे की, अपंगाच्या अथवा सामाजिक दमनाचे शतकानुशतके बळी ठरलेल्या सामाजिक गरजा वेगवेगळ्या असतील त्यामुळे त्यांना वेगवेगळे कायदे लागतील किंवा कायदयाच्या चौकटीतच निदान वेगळी वागणूक देणे गरजेचे राहील. त्यांना इतर प्रगत वर्गाच्या सोबत नेवून बरोबरीला वरील प्रमाणे परिणाम कारक वागणूक देण्यासाठी एक सकारात्मक हस्तक्षेप आवश्यक आहे. त्यालाच संरक्षक भेद म्हणतात.

ग्रिक विचारवंतानी सर्व सामान्य सुरक्षीततेचा व्यापक दृष्टीकोनातून विचार केला आणि सामाजिक परस्थितीत आरक्षणाला कायदयाच्या ध्येयाशी निगडीत केले. सामाजिक संस्थांच्या सुरक्षीततेशी त्यांनी सर्वसामान्यांना सुरक्षीततेला जोडले. समाजातील प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या नैसर्गिक गुणासहीत आणि इतरांशी होणारा वाद टाळण्याकरीता सुरक्षीत ठेवण्याचे एक साधन म्हणून कायदयाचा विचार केला. सामाजिक संस्थेची सुरक्षीतता ही प्रमुख सामाजिक गरज आहे. प्लेटो ह्या मताचा होता की, प्रत्येकाने त्यांच्या नैसर्गिक गुणानुसार आपली जबाबदारी पार पाडली, तर सामाजिक सौदाहार्य निर्माण होते. प्रत्येक व्यक्ती ही विशिष्ट गुण धैर्य, ज्ञान, आणि भुक घेवून जन्माला येतात हेच गुण तिन वेगळे सामाजिक गट निर्माण करतात. जसे की, राज्यकर्ते आणि शेतकरी व कामगार एकाच मानव जातीचे असे कृत्रिम वर्गीकरण करणे ही एक संकल्पना होती.

कुंभाराने कुंभारच असावे त्याने सोबतच वैमानिक असू नये शेतकऱ्याने शेतकरीच असावे. त्याने सोबतच न्यायाधिश होवू नये सैनिकाने सैनिकासोबतच उद्योगपती होवू नये आणि वैश्विक विद्वान जो ज्ञानाद्वारे सर्वकाही होवू शकतो आणि करू शकतो तो जर अशा आदर्श राज्यात आला तर त्याला तेथे थांबायला जागा राहू नये अशी प्लेटोची आदर्श राज्याची संकल्पना होती. ॲरिस्टाटलनेही ह्याच संकल्पनेला पुढे नेत म्हटले की, प्रत्येकाला त्याच्या त्याच्या वर्तुळात ठेवण्याची अवस्था म्हणजे न्याय.

भारतीय परिस्थीतीचा विचार केला तर बौध्द काळापुर्वी प्राचीन भारतातील कायदयाचे अंतिम उदिष्ट काय होते याचा विचार करून या ब्राम्हणी विचार सरणीवर मनूने समाजाला चार वर्गात विभागले. ज्यामुळे एकाच मानव जातीचे कृत्रिम वर्गीकरण झाले. मनुचा उद्देश सामाजिक सौदार्हय टिकविणे होता असे म्हणतात. प्रत्येकाची पात्रता तो कोणत्या वर्गात जन्माला येतो यावर ठरायची. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ह्याप्रकारच्या विचार सरणी विरोधात बंड पुकारले त्यांच्या मते चातुर्वर्ण्य हे समाजाला घातक असून ती अपयशी ठरणारी व्यवस्था आहे.

चातुर्वण्याचा विरोध करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्लेटोच्या संकल्पनेलाही मान्य केले नाही. दोहोमध्ये व्यक्ती सामाजिक गरजांची निट पुर्तता होवू शकत नाही. एखादयाच्या सामाजिक गरजेची पुर्तता त्याच्या पात्रतेनुसार व्हावी ही गोष्ट त्याचा कोणत्या वर्गात जन्म झाला यावर ठरू नये बाबासाहेबांच्या शब्दात सांगायचे तर प्लेटोच्या कल्पनेवर ज्या गोष्टीसाठी टिका व्हायला पाहिजेत त्याच गोष्टीसाठी चातुर्वर्ण्यावरही टिका व्हायला हवी. लोकांना अतिशय काटेकोरपणे काही वर्गात बांधून ठेवायची प्लेटोची संकल्पना म्हणजे माणूस आणि त्याच्या क्षमतेबाबतचे उथळ आकलन होय. प्लेटोला याचा विचारच करता आला नाही की, प्रत्येक व्यक्तीची क्षमता वेगळी त्याच्यात इतरांन पेक्षा वेगळे गुण असतात. आणि त्याद्वारे प्रत्येकाचे स्वतंत्र अस्तित्व असते. प्रत्येकाचा वेगळा वर्ग असतो. प्लेटोने प्रत्येकातील प्रचंड वैविध्य आणि सक्रिय वृत्तीचा विचारच केला नाही. आधुनिक विज्ञानाने हे सिध्द केले आहे. व्यक्तीबद्दल काटेकोर वर्गीकरण करणे योग्य नाही जर विविध व्यक्तींना वेगवेगळ्या वर्गात विभाजीत करण्यात आले तर त्याच्या विविध गुणांचा उपयोग योग्य प्रकारे करता येत नाही. ज्या कारणासाठी प्लेटोची गणराज्याची संकल्पना अपयशी ठरते. त्याच कारणाने चातुर्वर्ण्यही अपयशी ठरते. कारण वेगवेगळ्या वर्गातील व्यक्तींना पक्षांप्रमाणे खुराड्यात ठाकण्याची संकल्पना करणे शक्य नाही.

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Issue-31, Vol-05 July to Sept. 2019

Editor
Dr.Bapu G.Gholap

13) The Hybridity of History in the Novels of Salman Rushdie
Ms. Pooja Varma, Indore, M. P. ||61

14) धनगर समाजाची दिशा आणि दशा: एक चिंतन
प्रा. डॉ. कालिदास गुड्डे, जि. परभणी ||64

15) शंकरराव खरातांचा सामाजिक विचार
शोभा शंकरराव भुरभुरे & प्रा. डॉ. विद्याधर बन्सोड, चंद्रपूर ||67

16) वीर भगतसिंग यांचे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारी कार्य
नामदेव कोंडबाराव दळवी ||70

17) पर्यावरण प्रदूषण (Environment Pollution)
डॉ. जे. एम. काकडे, चंद्रपूर ||72

18) स्नातक स्तर पर प्रवेश प्रतिशत मे कमी का विश्लेषणात्मक अध्ययन: नकल के ...
डॉ० राधा यादव, डॉ० अनीता जायसवाल & कु० रीना रानी आर्या, बरेली ||79

19) मुख्य संवैधानिक प्रावधान एवं जनजातीय महिलाओं में जागरूकता का स्तर
सरस्वती भट्ट जोशी & डॉ. रेनू प्रकाश, अल्मोड़ा ||85

20) गुण्डोफर : हिन्द पार्थियाई शासकों के भारतीय परिप्रेक्ष्य
डॉ. संजय चौधरी, अयोध्या (उत्तर प्रदेश) ||94

21) कृषि क्षेत्र में प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना का महत्व
आकांक्षा देशमुख & डॉ. राकेश महाजन, देवास ||99

22) बैतूल जिले की कृषि शस्य–संयोजन प्रदेश में परिवर्तन
जितेन्द्र डावले, बैतूल (म.प्र.) ||102

23) स्त्री स्वाधीनता का प्रश्न और प्रेमचंद
Dr. JOTIMAY BAG, BARRACKPORE, WEST BENGAL ||108

24) व्यापक प्रौद्योगिकी और प्रयोजनमूलक हिन्दी
डॉ. प्रशांत प्रसाद गुप्ता, पश्चिम — बंगाल ||112

25) मत्स्यपुराण में ऋषि उत्पत्ति का निरूपण
डॉ. मुकेशकुमार पी. इडारीया ||115

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

६) धनगर समाजाच्या मुला-मुलींनी उच्चशिक्षित झालं पाहिजे.

७) धनगर समाजाच्या ओट बँकेप्रमाणे विधानसभेत आमदार गेले पाहिजेत.

८) धनगर समाजात नि:स्वार्थपणे समाजाचं काम करणारा नवा नेता निर्माण झाला पाहिजे.

९) समाजाची बांधिलकी म्हणून काम करणारा अभ्यासकही तयार झाला पाहिजे.

संदर्भ :

१) प्राचीन भारताचा इतिहास.

२) धनगर लोकसाहित्याचे अभ्यासक - डॉ. साहेब खंदारे.

३) वैचारिक लेख (धनगर समाजाचं विश्लेषण करणारे)

❑❑❑

15

# शंकरराव खरातांचा सामाजिक विचार

शोभा शंकरराव भुरभुरे
संशोधक,
ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर

प्रा. डॉ. विद्याधर बन्सोड
मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,
सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर

**********

शंकरराव खरात हे ग्रामीण कथाकार व दलित कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध आहेत. वैचारिक लेखनात, आंबेडकरी आंदोलनाचे सतत पडसाद घडविणारे म्हणून त्यांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. 'बाबासाहेबांच्या सहवासात', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर', 'अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम' इत्यादी पुस्तकांतून दलितांच्या मुक्तिलढ्याचे दर्शन घडविणारे लेखन त्यांनी केले.

सामाजिक जाणिवेशी प्रामाणिक राहून, भारतीय समाजरचनेतील जातिव्यवस्थेचे त्यांनी केलेले वर्णन माणुसकीला काळीमा फासणारे आहे. त्यांच्या कादंबरी लेखनामागे त्यांची प्रबळ अशी वाङमयीन निष्ठा दिसून येते. सर्वसामान्य माणसाच्या जीवनावर प्रेम करणारी एक जागृत जिज्ञासा आहे. अस्पृश्य, दलित, पिडितांचे भटके जीवन त्यांनी कादंबऱ्यांतून दाखविले आहे.

अस्पृश्य वर्ग भारतात गुलामीचे जीवन जगत होता. गावोगावी, खेडोपाडी दोन वर्ग दिसून येतात. त्यांची दोन स्वतंत्र वेगवेगळी जीवने दिसतात. गाव वेशीच्या आत राहणाऱ्यांचे एक जग तर गाव वेशीच्या बाहेर राहणाऱ्यांचे दुसरे जग, वेशीच्या बाहेर कायमस्वरूपी मृतवत दिसणारी, सुतकात पडल्यासारखी वस्तीत राहणारी माणसे, त्यांना माणुसकीचे अधिकार, हक्क मात्र नाहीत. गावाच्या वेशीच्या आत राहणाऱ्यांनी पिढ्यानपिढ्या

13) ROLE OF PERFORMANCE SPORT IN CHILD & YOUTH DEVELOPMENT
**Dr. Bhagwat Naiknaware, Dist. Jalna** ||70

14) Role of Self Help Group in Socio Economic Empowerment of Women,with ...
**Pagare M. P., Dist.-Jalna (M.S.)** ||73

15) A SOCIO ECONOMIC ANALYSIS OF WOMEN IN BELOW POVERTY LINE FAMILIES IN
**Shivakumara P., Mysore** ||76

16) Financial Inclusion with Special Reference to Rural Population
**Dr. Rajendra Ashokrao Udhan, Dist. Jalna** ||83

17) Optical studies on 2,5 Dialkoxy Poly p phenylen vinylene(ROPPV) Polymer
**Shruti Patel, Jabalpur(M.P.)** ||89

18) Tourism And Sustainable Development In Majha Region Of Punjab
**Dr. Shyopat Ram Saharan, Sri Ganganagar** ||93

19) मराठा आरक्षणाची लढाई एक प्रदिर्घ संघर्ष चिकित्सक अभ्यास
**डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर, बीड** ||97

20) जागतिकीकरणानंतरचा भारत
**प्रा.डॉ. श्रीमती कल्पना आहिरे, ओझर (मिग)** ||102

21) बालकामगार समस्या, कारणे आणि घटनात्मक व कायदेशीर तरतुदी
**केळे हरिचंद्र विष्णू & डॉ सौ. श्रध्दा एस. गावंडे, नागपूर** ||105

22) स्थानिक स्वराज्य संस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी व महीला नेतृत्वाचा उगम
**डॉ. आर. व्ही. मस्के, औरंगाबाद** ||109

23) भूमिपात: एक पर्यावरणीय समस्या
**प्रा. डॉ. राजाराम महादेव थोरात, जि. रायगड** ||112

24) सहकारी व्यवस्थापन ही काळाची गरज
**डॉ अनिल श्री खांडेकर, अमरावती** ||117

25) शंकरराव खरातांच्या ग्रामीण कादंबरीतील समाज जीवन
**शोभा शंकरराव भुरभुरे & प्रा. डॉ. विद्याधर बन्सोड, चंद्रपूर** ||120

25

# शंकरराव खरातांच्या ग्रामीण कादंबरीतील समाज जीवन

शोभा शंकरराव भुरभुरे
संशोधक,
ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर

प्रा. डॉ. विद्याधर बन्सोड
मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,
सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर

************

खरातांचे आरंभकाळी ग्रामीण साहित्य भरभराटीस होते. खेड्याकडे चला, या गांधीजींच्या आव्हानाचा परिणाम मराठी लेखकावरही झाला होता. त्यामुळे मर्यादित स्वरूपात ग्रामजीवनाचे पडसाद साहित्यात उमटले. पण विदारक सत्यापासून ही लेखक मंडळी अलिप्त राहीली. शंकरराव खरात यासारख्या दलित प्रतिभावंतांनी हे शिवधनुष्य पहिल्यांदा मोडले. गावगाड्यातील मांग, महारांचे व गावाबाहेरील विमुक्त भटक्यांचे जीवन ते साहित्यातून पहिल्यांदा आविष्कृत करू लागले. परिणामत: उपेक्षितांच्या प्रश्नांकडे सहानुभूतीच्या दृष्टीनेच खरात पाहू लागले. त्याचा प्रभाव साहित्यावरही उमटला. ग्रामीण साहित्यात ग्राम जीवनाचे चित्र उमटत असले तरी त्या साहित्याने पारंपरिकता, नियतीवाद, गतानुगतिकता यासारख्या बाबीच उगशी कवटाळल्या. परंतु उपेक्षितांच्या प्रश्नांकडे डोळस दृष्टीने पाहण्याचे सामर्थ्य ग्रामीण साहित्यातील उगवत्या पिढीला खरातांनी दिले. ग्रामीण भागातील अस्सल जीवनाचे दालन व त्याची व्याप्ती खरातांनीच पहिल्यांदा उघड केली. त्यामुळे खरात नव्या पिढीतील ग्रामीण साहित्याचे पहिले मार्गदर्शक ठरतात.

बाबासाहेबांच्या आंदोलनात वावरत असतांना ग्रामीण सुखदु:खांची, त्याच्या व्यथावेदनांची आणि त्यांच्या धर्म व समाजकृत अध:पतनाची प्रत्यक्ष प्रचिती आली. बालपणही भीषण दारिद्र्यात आणि अस्पृश्यतेच्या आगेखाली करपून गेलं. शिक्षणासाठी सोसाव्या लागणाऱ्या अपेष्टांनी आणि बहिष्कृत विश्वाच्या दाहक अनुभवांनी खरातांचे संवेदनशील मन रक्तबंबाळ झालं. हे अनुभव त्यांच्या मनावर वज्रलेप झाले. त्याचा उपयोग त्यांनी आपल्या वाङ्मयनिर्मितीसाठी केला. त्यामुळे खरातांच्या कादंबरीत ग्रामीण जीवनाचे पडसाद मोठ्या प्रमाणात उमटतात. सांगली सातार्‍याचा परिसर, तेथील खेडी, खेड्यातील वास्तव स्वातंत्र्योत्तर काळातील वास्तव त्यांच्या चालीरिती, निसर्ग, शिक्षण, काळेबाजार, विकोपास जाऊ पाहणारी नीतीतत्वे, अस्पृश्यता, दारिद्र्य या साऱ्यांचा प्रत्यय खरातांच्या कादंबरीत येतो.

लेखक ज्या वातावरणात वाढला, जगला असेल त्याचा ठसा त्याच्या कलाकृतीवर उमटत असतो. हे त्याच्या मनाचे स्पंदन असते. ते स्पंदन मानवी दु:खांना मुख्यत: हात घालते. त्यातील निसर्गापेक्षा मानवाच्या प्रत्यक्ष वेदनेला मुखर करण्यात त्यांना धन्यता वाटत असते. खरातांच्या कादंबरीबाबतही तसेच म्हणावे लागेल. त्यामुळे त्यांच्या कादंबरीत निसर्गाला गौण स्थान असते. निसर्ग हा त्यांच्या कादंबरीचा नायक कधीच नसतो. त्यांचे खरे नाते असते ग्रामजीवनाशी. तेथे नखशिखांत दु:खात बुडणाऱ्या माणसांशी. त्यामुळे खरातांचे नाते ग्रामीण साहित्याशीच अधिक जवळचे आहे असे वाटते. ग्रामीण जीवनातील सुखदु:खे, चढउतार, स्थित्यंगती यांचा आविष्कार करणाऱ्या साहित्याला ग्रामीण साहित्य असे म्हटले जाते. हा निकष पुढे ठेवला तरी खरातांच्या साहित्यात ग्रामीणतेचे अंश मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यामुळे ग्रामीण कथाकार या नात्याने खरातांची महती जशी पडते तशीच ग्रामीण कादंबरीकार म्हणूनही पडते.

'गावचा टिनोपाल गुरूजी', 'पारधी', 'मी मुक्त! मी मुक्त!', 'टाऊट' या कादंबऱ्या म्हणजे ग्रामीण जीवनाचा, तेथील समस्यांचा आणि ग्रामस्तरावरील सामाजिक दारिद्र्याने पिळलेल्या पारंपरिकता व अज्ञान यांचे प्रत्यही चटके सहन करणाऱ्या मानव समुहाचा अद्भुत अनुभवच म्हणावा लागेल. त्यातून ग्रामीण

जीवनाचा मनस्वी प्रत्यय घडतो. स्वातंत्र्योत्तर काळात बदललेली ग्रामीण परिस्थिती, शिक्षणाचा खालावलेला स्तर, परंगळलेली नीतीमत्ता आणि बदमाश राजकारणी माणसांनी चलती यासारख्या महत्वपूर्ण बाबींवर खरात प्रकाश टाकतात. वातावरण निर्मितीसाठी ग्रामीण भाषा, ग्रामीण वाक्प्रचार व म्हणी यांचा सर्रास वापरातून ग्रामीण वातावरण हुबेहूब घडवतात. प्रसंगी ग्रामीण निसर्गाचेही वर्णन करतात. परंतु तो निसर्ग विशिष्ट परिस्थितीच्या अनुषंगाने येतो. अनिवार्यता म्हणून तो येत नाही. एवढेच नव्हे तर शंकरराव खरातांच्या कादंबरीत निसर्ग गौणच असतो. 'पारधी' व 'टाऊट' सारख्या कादंबरीवरही ग्रामीणतेची छाप वाटते. प्रस्तुत कादंबऱ्या खरातांच्या वकिली व्यवसायामुळे ज्या ज्या उपेक्षित घटकांशी त्यांचा संबंध आला त्या उपेक्षितांच्या जीवनाशी संबंधित आहे. परंतु यातील माणसे ही ग्रामीण वातावरणात वावरणारी, परिस्थितीने खंगलेली, सामाजिक विषमतेचे चटके भोगलेली व जवळजवळ उद्ध्वस्त झालेली आहे. पारंपरिक रिणात व अज्ञानात वाढल्याने व उच्चभ्रू, सुसंस्कृत जगाने बहिष्कृत केल्याने ज्यांची अधोगती झाली आहे. त्यांचे हे जीवन आहे. वाट्याला आलेल्या प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करून मुक्ती मिळविण्याची त्यांची धडपड आहे पण ती बऱ्याच अंशी अपयशी ठरते. त्यातुन सुटकेचा मार्ग तो शोधु पाहतो. पण कावेबाज समाज व धूर्त माणसे त्यांना असहाय करतात. कधीकधी सूड म्हणूनच ते गुन्हेगार बनतात तर कधी अन्यायाची शिकार बनतात.

**'गावचा टिनोपाल गुरूजी' मधील समाज जीवन:**

'गावचा टिनोपाल गुरूजी' ही शिक्षण क्षेत्रात माजलेल्या विकृतिचे दर्शन घडविणारी कादंबरी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यापर्यंत पोहचली असली तरी नीतिमत्ता मात्र तेवढ्याच वेगाने पायदळी तुडविल्या गेली आहे. खेड्यातील कालचा पाटील आज सरपंच बनला. इंग्रजी आमदानीतील जमीनदारी संपून लोकशाही पद्धतीची शासनव्यवस्था सरपंचाचे रूपाने खेड्यातही आली आहे. परंतु हा सरपंच कालच्या पाटलाचे सुधारीत रूप आहे. तो लोकशाहीतील सरंजामदारच आहे. त्यामुळे त्यांची श्रीमंती, जन्मजात वर्चस्वाची भावना, तज्जन्य रगेली, एकूमत गाजविण्याची प्रवृत्ती, अक्कडबाजपणा आणि भोगलोलुपता या साऱ्यांची शिकार असहाय स्त्रिया आणि निरूपद्रवी सज्जन माणसे हकनाक होत आहेत. ग्राम पातळीवरील ही पापे दाबायला वरीष्ठ अधिकारी समर्थ आहेत. भ्रष्टाचाराच्या नरकात गळ्यापर्यंत डुबलेले हे लोकही त्यांचेच साथीदार. त्यामुळे असहाय व्यक्तींनी न्यायाची चाड न बाळगलेलीच बरी. परिणामत: कोणत्या तरी वासनेची शिकार होणे अथवा आत्महत्या करणे एवढाच पर्याय त्यांच्यापुढे असतो. व्यभिचार आणि कर्तव्यच्युतता या चाकांवर ज्यांचा जीवनरथ अनीतीच्या प्रदेशात स्वैरसंचार करतो. त्यांनाच सारे गुन्हे माफ आहेत. त्यांनाच प्रमोशन मिळतो. राष्ट्रपती पारितोषिके मिळतात. तेच सभापती, आमदार बनतात. हे स्वातंत्र्योत्तर काळातील एक भयान सत्य आहे. या विदारक सत्याला प्रस्तुत कादंबरीत खरातांनी स्पर्श केला आहे.

ग्रामीण परिसराचा खरातांना दांडगा अनुभव आहे. खेड्यातच त्यांचे बालपण गेल्याने त्या जीवनातील चढउतार त्यांना चांगले ठाऊक आहेत. तेथल्या रितीरिवाजांची व उद्ध्वस्त नीतीमत्तेची त्यांना जाणिव आहे. हल्ली शिक्षण क्षेत्रात माजलेल्या अंधाधुंदीच्या व गावातील टगेगिरीचा तसेच नीतीमूल्यांच्या पडझडीचा परिणाम त्यांना दाखवायचा आहे. फालतू राजकारणाने सामान्य माणसांचे जीवन कसे उद्ध्वस्त होवू शकते यावर खरातांनी चांगला प्रकाश टाकला आहे. त्यासाठी त्यांनी केलेली वातावरणनिर्मिती, त्यांचे वर्णन सामर्थ्य, हृपखल शब्द योजना, ग्रामीण परिसराचे वर्णन करतांना उभा केलेला निसर्ग, ग्रामरचना या साऱ्यांचे प्रभावी दर्शन घडते. प्रस्तुत कादंबरी लेखनात खरात यशस्वी झाल्याचा प्रत्यय येतो. म्हणूनच 'गावचा टिनोपाल गुरूजी' ही स्वातंत्र्यानंतरची खेड्याला देणगी आहे असे उद्‌गार डॉ. फडक्यांनी काढले आहेत.

**'टाऊट' मधील समाज जीवन :**

खरातांची 'टाऊट' ही कादंबरी म्हणजे वकिली व्यवसाय करतांना आलेल्या अनुभवांचा आलेख आहे. खरातांनीच या संदर्भात म्हटले आहे की, मला वकिली व्यवसायात आलेले अनुभवच 'टाऊट' या नावाने प्रसिद्ध झालेले आहेत. एकंदरीत प्रस्तुत कलाकृतील

आत्मवृत्तात्मक कादंबरी म्हणणे सोयीचे होईल. घारमारे नावाने एक गृहस्थ काही लोकांना घेऊन त्यांच्याकडे येतात. आपण टाऊटगीरीचा धंदा करीत असल्याने तो सांगतो. 'टाऊट' म्हणजे वकिलाचे एजंट. असा त्या शब्दाचा तो खुलासा करतो. वकिलाचे सोबत स्वत:चेही पोट भरण्याचा त्याचा व्यवसाय आहे. आजवर त्याने अनेक आरोपी वकिलासमोर सादर करून त्यांच्या बचावाकरिता वकिलाकरवी कोर्टात केसेस उभ्या केल्या. काहींना जामिनावर सोडविले. तर काही गुन्ह्याचे स्वरूप पाहून वकिलांनीच त्यास नकार दिला. पाकिटमार करणाऱ्यांपासून तर दरोडेखोरांपर्यंत आणि सोडचिठ्ठी पासुन पळवून आणलेल्या स्त्रियांचे कायदेशिर प्रश्न सोडविण्यापर्यंत अनेक केसेसशी घारमाऱ्याचा संबंध येतो. त्यांना घेऊन तो वकिलाकडे येतो. त्यांची बाजू मांडतो. त्यावर त्याचा कसाबसा उदरनिर्वाह चालतो. परंतु त्याच्या जीवनातले सर्वच प्रश्न सुटत नाही. त्याची लाचारी कायम राहते. त्यामुळेच भाचीच्या मयतीसाठीही त्याचेजवळ पैसे नसतात. ते तो वकिलाकडूनच नेतो. स्वत:च्या पोटाचे ऑपरेशन झाल्यानंतरही त्याची दयनिय अवस्था पाहून वकिलच मदत करतो आणि रस्त्यालगतच्या वडाखाली भीक मागुन जगण्याची शेवटी त्यांच्यावर पाळी येते. वकिलाची सचोटी आणि सेवाभावी वृत्ती यावर त्यांचा विश्वास आहे. त्यामुळे अनेक आतल्या गोष्टीही तो मोकळेपणाने त्यांचे जवळ सांगतो. साहेब मी अनेक लोकांचे बंगले उभे केले, पण मी शेवटी फूटपाथवरच आलो हे तो दर्दभऱ्या शब्दांत सांगतो आणि पोटाला काहीतरी देण्याची विनंती करतो. ती पूर्ण होताच डोळ्यांत तेज येऊन तो म्हणतो, साहेब? मला बरा होऊ द्या. मी तुमच्याकडे पुन्हा भारीभारी खटले आणीन. असे स्पष्ट सांगतो. पण वकिलाचा त्याच्या बोलण्यावर विश्वास बसत नाही. अनंताच्या वाटेवर असलेला तो उद्ध्वस्त 'टाऊट' उपड्यावर जगत होता. त्याचा शेवट काय झाला हे त्या वकिलासही ठाऊक नाही. पण त्याची ही अवस्था म्हणजेच खऱ्या अर्थाने त्याचा शेवट म्हणावा लागेल. एवढी ती अवस्था भयंकर आहे.

**'मी मुक्त! मी मुक्त!' मधील समाज जीवन :**

'मी मुक्त! मी मुक्त!' ही १९७९ साली प्रसिद्ध झालेली कादंबरी अकाली मातृत्व आल्याने सामाजिक बदनामी टाळण्यासाठी टाकून दिलेली अनाथ मुले. पोटासाठी गुन्हेगारी करून पकडली गेलेली गुन्हेगार मुले व परिस्थितीला कंटाळून विधवा स्त्रियांनी स्वहस्ते अनाथाश्रमात दाखल केलेली असहाय मुले, यांच्या जीवनाची ही कर्मकहाणी आहे. एक महिन्याचा अनाथ असलेला बाळ हॉस्पिटलमध्ये भरती केल्या जातो. त्याचा सर्वानाच लळा लागतो. तेथून त्याला रिमांड होममध्ये भरती करण्यात येते. 'कोर्ट कमिटेड बॉय' असा त्याला शेरा लागतो. गृहाच्या संचालिका आनंदीबाई कष्टाळू व प्रेमळ स्त्री आहे. त्याचे सर्वांवर प्रेम आहे. इथे त्याला मल्या, लख्या, पांड्या भग्या ही मित्रमंडळी मिळते. दिवाळीत मुले घरी गेली की, मी एक वनवासी मी एक उदासी पाखरू! तुझ्याविना ग आई आस कुणाची धरू अशी त्याची अवस्था होते. हॉस्पिटलमधील आशाताई नावाची समाजसेविका त्याच्यावर खूप प्रेम करते. त्यामुळे ती त्याला वारंवार भेटते. त्याची विचारपूस करते. आपला हा मुलगाच आहे असे तिला वाटते. कपड्यांपासून खाण्यापर्यंतचे त्याचे सारे गोड कौतुक ती करते. तेथून नगरच्या विद्यार्थी आश्रमात त्याची रवानगी होते. त्यामुळे त्याला वाईट वाटते. बाई मला इकडे तिकडे का फिरवतात? एकाच ठिकाणी का सोय करीत नाहीत? असा प्रश्न त्याला पडतो. आशा त्याचे सांत्वन करते. कपडे शिवून देते व तो नगरला रवाना होतो. नव्या जीवनाला प्रारंभ होतो. कोर्ट कमिटेड म्हणून साऱ्यांच्या तुच्छ नजरा त्याच्यावर रोखल्या जातात. तो कमालीचा बेचैन होतो. अरे बाबा! या खोलीत कोर्ट कमिटेड मुलं आहेत. रिमांड होमच्या मुलांशिवाय इथं दुसरा मुलगा नाही. असं कळताच त्याला वाईट वाटते. अपराधीपणाची जाणीव होते. तिथे त्याची दिनचर्या सुरू होते. ताट, वाटी मिळते. पालकर सरांना मात्र संशय येतो. चांगले कपडे कुठून आणले अशी विचारणा होते. तो आशाताईचे नाव सांगतो. त्यांना पत्र पाठवून विचारणा करू असे पालकर म्हणतात. पण पुढे त्याचेवर सरांचा विश्वास बसतो.

पालकरांच्या घरी त्याची ये जा वाढते. एक दिवस त्याची पत्नी बाळवर चोरीचा आळ घेते व

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

109

International Multilingual Research Journal

# विद्यावार्ता™

Issue-15, Vol-01, July to Sept.2016

Editor
Dr.Bapu G. Gholap

www.vidyawarta.com

Principal
Aniket College of Social Work
Wadsa, Dist. Gadchiroli

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE, 2021, VOL- 10, ISSUE-56

## Special Issue of Department of Library, Lokmanya Mahavidyalaya Warora, Dist. Chandrapur

On

# USE OF INFORMATION TECHNOLOGY IN LIBRARY SERVICES

**Chief Editor**

Dr. Subodh Kumar Singh
Principal

**Editor**

Smt. Leena N. Puppalwar
Librarian

**Associate Editor**

Dr. Jayshree P. Shastri (Head, Marathi Dept.)
Dr. Shrinivas N. Pilgulwar (Head, Sociology Dept.)
Prof. Tanaji S. Mane (Head, Pol. Sc. Dept.)
Dr. Dipak P. Lonkar (Head, History Dept.)
Prof. Uttam R. Deulkar (Director, Phy. Ed. Dept.)
Dr. Ravindra Bapurao Shende (Head, Department of Economics)
Prof. Shrikant N. Puri (Head, English Dept.)

Principal
Aniket College of Social Work
Wadsa, Dist. Gadchiroli

# माहिती तंत्रज्ञान आणि महाविद्यालय ग्रंथालयात आधुनिक माहितीसेवांची उपयुक्तता

**डॉ. रेखा ताराचंद झलके**

*ग्रंथपाल, अनिकेत समाजकार्य महाविद्यालय वडसा (देसाईगंज), जि. गडचिरोली*

**प्रस्तावना :—**

सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग असून या तंत्रज्ञानाचा विकास झपाट्याने होत आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र हे माहितीतंत्रज्ञानाच्या जवळचे क्षेत्र असल्याने जास्तीत जास्त प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा वापर या क्षेत्रात होत आहे. परिणामी ग्रंथालय व माहितीशास्त्र क्षेत्राची प्रगती ही तितक्यात प्रचंड वेगाने होत असून 'डिजीटल ग्रंथालय' संकल्पनेचा विकास हा एक त्यातील प्रगतीचा टप्पा आहे. आधुनिकतेमध्ये संगणक, तंत्रज्ञान, माहिती प्रसारण तंत्रज्ञान तसेच नेटवर्कींग इ. प्रगत तंत्रज्ञानाचा समावेश होतो. संगणकीकरणाला ग्रंथालयामध्ये महत्वाचे स्थान प्राप्त झाले असून संगणकीकरण व संगणकाचे प्रगत ज्ञान अवगत नसेल तर याबाबतीत यंत्रणा निरक्षर समजल्या जाईल. आधुनिक काळात ग्रंथालयामध्ये विविध प्रकारच्या सेवा संगणकीकरणाव्दारे देण्यात येत असल्यामुळे आधुनिक माहिती सेवांचे महत्व अत्यंत मोलाचे असून वाढले आहे.

**१.१. आधुनिक माहिती सेवांचा विकास**

माहितीसेवा उपयोजकांच्या यशाची गुरूकिल्ली आहे. ग्रंथालय वाचकांना विविध प्रकारच्या जास्तीत जास्त सेवा प्रदान करून ग्रंथालयाच्या तसेच संस्थेच्या उद्दिष्ट पुर्तीसाठी सातत्याने प्रयत्नशिल असतात. कोणत्याही महाविद्यालयाचे शिक्षण संशोधन आणि विस्तार तसेच उपयोजकांचा सर्वांगिण विकास हे महत्वाचे ध्येय असल्याने विद्यापीठ तसेच महाविद्यालयामध्ये ग्रंथालयांना अतिशय महत्वाचे स्थान असून ती केंद्रस्थानी आहेत.

महाविद्यालय ग्रंथालय वाचकांना विविध प्रकारच्या वाचन विषयक सेवा देण्याचे महत्वाचे कार्य करीत असतात. सद्यस्थितीत माहितीसेवा देण्याचे स्वरूप बदलले असून ते आधुनिक झालेले आहे. त्याच अनुषंगाने सद्यस्थितीत आधुनिक कामामध्ये नेटवर्क हि संकल्पना सर्वांच्या दैनंदिन जिवनाचा अविभाज्य भागच झाले आहे. प्रत्येक व्यक्ती कळत—नकळत कोणत्याही कारणास्तव कुठल्याना कुठल्या नेटवर्क सेवेचा लाभ होतच असतो. नेटवर्कचे माहिती आणि दळणवळण संबंधीच्या गरजांनाही यामध्ये महत्वाचे स्थान आहे. त्यामध्ये इंटरनेट, ई—मेल यासारख्या सेवा उपलब्ध असून ग्रंथालय व माहितीचे नेटवर्क या दळणवळणातील प्रगत तंत्रज्ञानावर आधारित सेवांचा ग्रंथालयामध्ये समावेश होतो. नेटवर्कचा उपयोग डेटाट्रान्स मिशनसाठी होत असून आवश्यक माहिती इंटरनेटव्दारे पाहीजे त्यावेळी मिळते. सद्यस्थितीत इंटरनेट, युजनेट, बीटनेट, जॅनेट इ. खाजगी व सरकारी पब्लिक को—ऑपरेटिव्ह नेटवर्क अस्तित्वात आले आहेत.



Principal
Aniket College of Social Work
Wadsa, Dist. Gadchiroli

ग्रंथालयात असते परंतू त्यासाठी खर्च, ग्रंथालय कर्मचाऱ्याच्या कामात वाढ, दुसऱ्या ग्रंथालयाच्या ग्रंथविनंतीला प्रतिसाद देणे यावर ही सेवा ग्रंथालयात साध्य करता येते.

**आज्ञावली :—**

यामुळे सुचिबध्द डेटाबेसची माहिती प्राप्त होते. डेटाबेस परिवर्तन करता येते, तंत्रज्ञानाचे मनुष्यबळ टिकविता येते, संगणकीकरण प्रक्रिया केंद्रित होवू शकते, ग्रंथपालास तांत्रिक पार्श्वभुमिची माहिती मिळते.

**इतर सोयी :—**

यामध्ये सुसज्ज इमारत, प्रशिक्षित कर्मचारी, अद्यावत उपकरणे इत्यादी सोयींचा समावेश होतो. या सोयींची सुध्दा ग्रंथालयात उपयुक्तता तातडीने भासते.

**निष्कर्ष :—**

अशाप्रकारे निरीक्षणाअंती असे स्पष्ट होते की, उपयोजकांच्या आधुनिक गरजा खुप असून त्यांची उपयुक्तता अतिशय महत्वाची आहे. ग्रंथालयांची वाढ जरी समाधानकारक असली तरी संसाधनाचा मात्र अभाव असल्यामुळे आधुनिक माहिती सेवा देण्याच्या दृष्टिने संसाधनाची ग्रंथालयात उपलब्धता महत्वाची आहे. परंतू या आधुनिक माहिती सेवा मात्र ग्रंथालयाकडून पुरविल्या जात नाही. अर्थात याबाबतची अनेक कारणे असू शकतात.

**संदर्भ आणि ग्रंथसुची :—**


१) जैन, देशपांडे, डाखोळे आणि खेडकर, २००१ सुलभ ग्रंथालयशास्त्र, नागपूर, विश्वप्रकाशन.
२) तपस्वी, मु.पु.,१९९५, ग्रंथालयात संगणकाचा उपयोग, नाशिक, य.च.म.मु.वि. प्रकाशन.
३) नागु, श्री. रा., १९९५ माहिती सेवा आणि संघटना, नाशिक, य.च.म.मु.वि. प्रकाशन.
४) फडके, द.ना., २००७, ग्रंथालयाचे आधुनिकीकरण आणि संगणकीकरण, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.
५) बोधनकर आणि अलोणी, १९९९, सामाजिक, संशोधन पध्दती, नागपूर, साईनाथ प्रकाशन.
६) भांडारकर, पु.ल., १९८१, सामाजिक संशोधन पध्दती, नागपूर, कुलकर्णी प्रकाशन.
७) मेश्राम सुरेश, २०००, प्रात्याक्षिक सामाजिक संशोधन, नागपूर, मातृसेवा संघ प्रकाशन.
८) त्रिपाठी लाल आणि कुमार, २००१, ग्रंथालय एवं सुचना विज्ञान, न्यु. दिल्ली, एस.एस.प्रकाशन.




Principal
Aniket College of Social Work
Wadsa, Dist. Gadchiroli

उपयोजकांना आवश्यक असलेली माहिती संगणकाव्दारे छपाईच्या माध्यमातून सुध्दा त्वरीत प्राप्त होते. त्याचबरोबर प्रतीरूपलेखन सेवेचाही लाभ घेता येतो. ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्यासाठी वाचकांना त्वरीत सेवा मिळाव्या या उद्देशाने विविध प्रकारच्या आज्ञावली ( Software) विकसीत झाल्या आहेत. त्याचबरोबर बारकोड, मल्टीमिडीया, सी.डी. इ. तंत्रज्ञान विकसीत झाले आहे. ग्रंथालयामध्ये कमी श्रमात, कमी वेळेत आवश्यक ती सेवा या साधनाव्दारे वाचकांना दिली जाते. विविध प्रकारचे डेटा विकसीत झाले असून त्यामध्ये डेटाबेस संकलन या अनुषंगाने मायनिंग, मेटाडेटा, याचबरोबर इंग्रजी डेटा मराठी भाषेत लिपी इतर प्रादेशिक भाषेत उपलब्ध होण्याच्या दृष्टिने युनिकोड निर्मीती झाल्या. अशाप्रकारच्या आज्ञावली ग्रंथालयात आधुनिकतेच्या दृष्टिकोनातून माहिती समक्षपणे देण्यासाठी उपलब्ध आहेत.

पुर्वीच्या काळी ग्रंथनिर्मीती मोठ्या प्रमाणावर होत नव्हती. माहितीच्या विस्फोटाच्या काळामध्ये ग्रंथनिर्मीती झपाट्याने लागली. त्यामुळे ग्रंथनिवड, यांचे मुल्यांकन व खरेदी या कामाचा आवाका वाढल्याने ग्रंथालयातील उपार्जन प्रक्रिया कार्यक्षम हाताळणे परंपरागत पध्दतीने कठीण झाले. त्यासाठी संगणकाचा वापर केल्यानंतर कामाच्या वेगामध्ये वाढ झाली. कामाचा दर्जा वाढला व वाचकांना पुर्वीपेक्षा चांगली व तत्पर सेवा देणे शक्य झाले असून हे सिध्द झाले.

सद्यस्थितीत इंटरनेट आणि डिजीटल तंत्रज्ञानाच्या विकासामुळे या स्वरूपात माहिती प्रकाशित करणे शक्य झाले. इलेक्ट्रानिक स्वरूपात साहित्यप्रकारचा वेग वाढला आहे. ग्रंथालयात विविध इलेक्ट्रानिक स्वरूपातील साहित्याच्या उपलब्धतेची आवश्यकता हळुहळु वाढली आहे. त्यामध्ये इ–जर्नल, इ–बुक्स, संदर्भ डेटाबेस, सांख्यिकी माहितीचे डेटाबेस, भौगोलिक माहिती संदर्भ डेटा बेस इत्यादी प्रकारच्या साहित्यात वाढ झाली आहे. इ–स्रोत साहित्य ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध आहे. सद्यस्थितीत ग्रंथालय खालील प्रमाणे आधुनिक पध्दतीने सेवा देत असल्याचे दिसुते.

१) इंटरनेट व इ–मेल
२) संदर्भ सेव
३) प्रचलित जागरूकता सेवा
४) निवडक प्रसारण सेवा
५) जालीका सेवा (ओपॅक)
६) वर्तमानपत्र कात्रण सेवा
७) भाषांतर सेवा
८) निर्देशन आणि सारलेखन सेवा

अशा विविध प्रकारच्या सेवा संगणाव्दारे दिल्या जातात.

ISSN 2249-3344
The North Pole



अनिकेत शिक्षण संस्था दिघोरी, (ना.) जि. भंडारा

द्वारा संचालित

# अनिकेत समाजकार्य महाविद्यालय

वर्धा/वडसा

# विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषदेचे

७ वे

राज्यस्तरीय

अधिवेशन

✲ विषय ✲

दुर्बल घटक : प्रश्न आणि आव्हाने

दिनांक

२४ व २५ डिसेंबर २०१६

स्थळ

सामाजिक न्याय भवन, वर्धा

Principal

Aniket College of Social Work

Wardha

ISSN 2249-3344 ( The North Pole)

# लघुउद्योगातील उपयोजकांची माहितीची गरज आणि माहिती सेवा

कु.रेखा ताराचंद झलके
ग्रंथपाल
अनिकेत समाजकार्य महाविद्यालय, वडसा जि.गडचिरोली
ईमेल आय.डी. –rekhazalke53@gmail.com

सारांश

भारतात बेकारीची समस्या अधिकाधिक गंभीर स्वरूप धारण करीत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे बेकारीत भर पडत आहे. आपल्या देशात भांडवलाची कमतरता असल्यामुळे थोडया भांडवलात अनेक लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मोठया उद्योगांचा विकास केल्यामुळे हा प्रश्न सुटणार नाही म्हणून भारत सरकारने लघु व कुटीरउद्योगांच्या विकासाकडे स्वांतत्र्योत्तर काळात लक्ष दिले. जगातील सर्व देशात लघु उद्योग मोठया संख्येने आहेत परंतु भारताच्या अर्थव्यवस्थेत त्यांना एक विशिष्ट स्थान आहे. उद्योगासाठी लागणाऱ्या भांडवली व इतर संसाधनाच्या गरजेच्या मानाने तुटवडा असणाऱ्या भारतासारख्या विकसनसील देशात लघु उद्योगांची वाढ होणे आवश्यक आहे. लघु उद्योगासाठी आवश्यक असणारे अकुशल व अर्धकुशल कामगार आपल्या देशात उपलब्ध आहेत. बेकारांना रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यात लघु उद्योगांचा सिंहाचा वाटा आहे.

## प्रास्ताविक

विदर्भ महाराष्ट्रात आल्यावर दुसरे औद्योगिक पर्व सुरू झाले. त्यात मात्र विदर्भ हळुहळु मागे पडु लागला. 1960 च्या सुमारास लोकसंख्या, औद्योगिक व व्यापारी प्रगतीत नागपुर शहर हे पुणे शहरापेक्षा प्रगत होते. परंतु दुसऱ्या औद्योगिकरणात मात्र पुण्याची प्रचंड औद्योगिक प्रगती झाली. अर्थात त्यासाठी काही अंशी जरी पुण्यातील मानसीकता कारणीभुत असली तरी मुख्यतः ही प्रगती सरकारच्या मुद्दाम अवलंबीलेल्या धोरणामुळेच झाली. विदर्भात या काळात इतर छोटे मोठे उद्योग सुरू झाले. विदर्भात आज जवळ जवळ दहा हजाराहून जास्त लघुउद्योग आहेत. परंतु खऱ्या अर्थाने मोठे उद्योग नसल्याने व राजधानी नागपूरात नसल्यामुळे खुप मोठया बाजारपेठांपासुन विदर्भ वंचित राहीला आहे.

महाराष्ट्र विकास मंडळाची स्थापना 1962 च्या सुमारास झाली व पिंपरी चिंचवड व पश्चिम महाराष्ट्रात उद्योगिक वसाहती निर्माण झाल्या, परंतु विदर्भात मात्र पहिल्या बारा वर्षात म्हणजेच 1962 ते 1974 मध्ये फक्त नागपूर, अकोला व चंद्रपूर येथे औद्योगिक वसाहती निर्माण झाल्या. विदर्भात सर्व प्रकारच्या खनिज, कोळसा व विज विपूल प्रमाणात आहे. त्यांचा आधार घेवून या क्षेत्राचा विकास झाला असता परंतु सरकारला त्यात अजुनही यश मिळविता आले नाही.

विदर्भात लघुउद्योगाची स्थिती दयनीय आहे. व त्यांचे मुख्य कारण म्हणजे वित्त पुरवठा हा कधीच वेळेवर होत नाही. तसेच आजारी उद्योगांना विशेष सवलती दिल्या जात नाहीत. त्यामुळे विदर्भ मागेच आहे. एका आजारी उद्योगाच्या सर्वेक्षणात हे लक्षात आले की जवळ जवळ 40 टक्के उद्योग अपुऱ्या वित्त पुरवठयामुळे आजारी होतात.

## व्याख्या

सामान्यतः लघु उद्योग म्हणजे छोटया प्रमाणावर केला जाणारा धंदा होय. केंद्र सरकारने लघु उद्योगाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

"लघुउद्योग म्हणजे असा व्यवसाय की ज्याची यंत्रसामुग्रीतील भांडवल गुंतवणूक 1 कोटी रुपयापेक्षा जास्त नसेल मग ती यंत्रसामुग्री मालकीची असो, भाडेपट्टयाने घेतलेली असो किंवा भाडे खरेदी तत्वावर घेतलेली असो".

## लघुउद्योगांची उद्दिष्टे

Principal
Aniket College of Social Work
Wadsa, Dist. Gadchiroli

1. किमान भांडवली गुंतवणुकीत रोजगाराच्या संधी उपलब्ध

ISSN 2249-3344 ( The North Pole)

कोणता उद्योग हाती घ्यावा, तो कुठे सुरु करावा, त्यासाठी जागा, इमारतीची व्यवस्था कशी करावी, भांडवलाची उभारणी कशी होईल, यंत्रसामुग्री कशी मिळविता येईल, कच्चा माल कसा मिळवावा, तयार मालाला बाजारपेठ कुठे मिळेल, योजना, सरकारी परवाने, विज, पाणी, कुशल तंत्रज्ञ, अनुभवी कारागिर यांची माहिती अशा होतकरू लोकांना असत नाही. किंबहूना ती माहीती कोठे मिळु शकेल याचे ज्ञान असू शकत नाही. या सर्व अडचणींना तोंड देत असतांना कित्येक वेळा निराश होण्याचे प्रसंग येतात. खर सांगायचे तर आदिवासी भागातील उपयोजकांमध्ये शिक्षण व प्रशिक्षणाचा प्रभाव असल्याने माहितीची जाणीव करून घेत नाहीत. यावरून लघु उद्योगाच्यादृष्टीने माहितीच्या गरजा असतात.

लघु उद्योगाच्यादृष्टीने उपयोजकांना प्राप्त होणाऱ्या माहितीसेवा, घटक, संसाधने

1. माहिती केंद्र व शासनाचे अधिकारी वर्ग

यामध्ये पुढील महत्वपुर्ण मुददयांचा समावेश करता येईल.

लघु उद्योगाची निवड – जिल्हा उद्योग अधिकारी

लघु उद्योगाची जागा – जिल्हा उद्योग अधिकारी

लघु उद्योगाची नोंदणी – जिल्हा उद्योग अधिकारी

भांडवल – जिल्हा परिषद महा.रा.वित्तीय महामंडळ

कच्चामाल – उद्योग संचालनालय

यंत्रसामुग्री – लघुउद्योग सेवा संस्था

बाजारपेठ– लघुउद्योग सेवा संस्था

तांत्रिक सल्ला – लघुउद्योग सेवा संस्था

भांडवल भागीदारी – महाराष्ट्रा राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ

कामगाराचे शिक्षण – लघुउद्योग सेवा संस्था किंवा एक्सटेंशन केंद्रे

विदेशी सहयोग – उद्योगसंचालनालय, फॉरेन इन्व्हेस्टमेंट बोर्ड

वीज अनुदान सहाय्य– विभागीय उद्योग अधिकारी (उप सहसंचालक)

गुणमुद्रायोजना– सहाय्यक संचालक(गुणमुद्रा) इंडस्ट्रियल रिसर्च लॅबेरेटरी

निर्यात व्यापार – डायरेक्टर ऑफ एक्सपोर्ट प्रमोशन, उद्योग संचालनालय.

सर्व प्रकारची माहिती – जिल्हा उद्योग केंद्र व चेंबर ऑफ कॉमर्सचा लघुद्योग विभाग.

उपरोक्त विवेचनावरून असे दिसून येते की, विदर्भातील आदिवासी जिल्ह्यातील लघुउद्योगातील उपयोजकांना जिल्हा स्तरावर शासनाचे अनेक आर्थिक सोयी व संस्था उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे उपयोजकांना विविध माहितीसेवा प्राप्त करून घेता येतात.

2. शासनाचे विविध उपक्रम

शासनाने अलिकडील काळात लघु व कुटीर उद्योगाबाबत अधिक वास्तववादी भुमिका स्वीकारली आहे. भारतातील परिस्थितीत लघुउद्योगांना महत्वाचे स्थान आहे. विदर्भातील आदिवासी जिल्ह्यातील साधन सामुग्रीचा, मनुष्यबळाचा पुरेपुर वापर करण्यावर शासनाचा भर आहे. त्यासाठी कच्च्या मालाचा पुरवठा, अर्थसहाय्य, विविधबोर्ड व

Principal
Aniket College of Social Work
Wadsa, Dist. Gadchiroli

करून देणे.

2. लघुउद्योगांच्या विकासामुळे देशातील राष्ट्रीय उत्पन्नाचे समाजातील विविध घटकात समान वाटप करणे शक्य आहे.
3. मानवी संसाधनाचा योग्य वापर करणे. श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर करून मानवी भांडवल योग्य प्रकारे उपयोगात आणता येते.
4. देशातील विविध प्रदेशात असणारी प्रादेशिक विषमता कमी करून सर्व विभागाचा समान विकास लघुउद्योगांच्या मदतीने साध्य करणे.
5. ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन करणे व अशा वस्तूंची आयात होणार नाही यादृष्टिने लघुउद्योगांनी दर्जेदार वस्तूंचे उत्पादन करणे.
6. कल्पकतेच्या साह्याने उद्योजकतेच्या विकासासाठी प्रयत्न करणे.
7. मोठया उद्योगांना लागणाऱ्या सुटया भागांची निर्मिती करणे.

लघु उद्योगांचे महत्व

1. समाजाच्या फार मोठया गटाला रोजगार पुरविण्याची क्षमता लघु उद्योगात आहे.
2. मोठया उद्योगांच्या तुलनेत लघु उद्योगांना कमी भांडवल लागते.
3. कुशल कामगारांची फारशी गरज नाही.
4. आयातीवर फारसे अवलंबुन राहावे लागत नाही.
5. समतोल प्रादेशिक विकास शक्य होते.
6. आर्थिक समानता आणण्यासाठी प्रयत्न करतात.
7. आर्थिक विकासासाठी औद्योगिक वातावरण योग्य असावे लागते.
8. लघु उद्योगावर व्यापार चक्राचा परिणाम होत नाही.
9. शेतीवरील लोकसंख्येचे ओझे कमी होण्यास मदत होते.
10. मोठया उद्योगधंदयांना मदत होते.

आदिवासी क्षेत्रातील लघु उद्योग

विदर्भाच्या आदीवासी क्षेत्रात साधारणतः पुढील प्रमाणे लघु उद्योग सुरू आहेत.

–सॉमिल, बेकरी उद्योग, फर्निचर, प्रिंटिंग प्रेस, विटांचे कारखाने, दुध डेअरी, नर्सरी उद्योग, पोल्ट्री फार्म, भात गिरणी, फ्लोअर मिल, पोहामिल, मिरची व मसाले कांडण, मशरूम लागवड, शेळीपालन, वराहपालन, म्हशीपालन, बांबुकाम, सुतारकाम, शिवणयंत्र, शहदाचे पोळे तयार करणे, गांडुळखंत तयार करणे, निंबोळीअर्क तयार करणे, दुग्धव्यवसाय, जंगलमेवा गोळा करणे, बिडीकाम, बिडी पत्ता जमा करणे, औषधी वनस्पती गोळा करणे, झाडू तयार करणे, कंगवे तयार करणे, पान्होळयापासून वस्तु तयार करणे, जळ तयार करणे, सेवई, पापड, लोणची, मसाला, पत्रावळी तयार करणे, तागापासुन वस्तु बनविणे, लाकुड उद्योग, रेशीम उद्योग, गुळ व खांडसरी उद्योग, कथ्था बनविणे.

लघु उद्योगांच्या दृष्टीने उपयोजकांची माहितीची गरज

उपरोक्त विविध लघु उद्योगांसाठी उपयोजकांना माहितीची गरज असते. त्यासाठी प्रत्येकाला स्वतंत्र काहीतरी लघु उद्योग सुरू करावा याकरीता लघुउद्योग चालविण्यास योग्य अशी स्वतःची माणसीकता ठेवावी लागते. पण कोणत्याही प्रकारचा नवीन उद्योग सुरू करावयाचा म्हटला म्हणजे उपयोजकांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते.

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता™

July To Sept. 2016
Issue-15, Vol-01

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

- विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहुभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

- 'विद्यावार्ता' हे त्रैमासिक मालक व प्रकाशक अर्चना राजेंद्र घोडके यांच्या हर्षवर्धन पब्लिकेशन प्रायव्हेट लिमीटेड, लिंबागणेश, जि. बीड महाराष्ट्र येथे मुद्रीत करुन संपादक डॉ. बापू गणपत घोलप यांनी मु.पो. लिंबागणेश, ता.जि.बीड–४३११२६ येथे प्रकाशित केले.

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
Mobi. 09850203295, 07588057695



Principal
